मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

परस्परं भावयन्तः

म प्र

# हितगुज

अंक ६३ ● संपादक : लक्ष्मण शंकर (पृष्ठ ५२०) ● सप्टेंबर २००५

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.)

(फक्त खाजगी वितरणासाठी)

एक आगळीवेगळी स्पर्धा

## होय, मला लग्न करायचंय-

- **वामन गणेश** (पृ.५०३), जोगेश्वरी, मुंबई

हितगुजच्या अंकातून येणारी वधु-वरांची माहिती व अपेक्षा याबाबतचा मजकूर वाचून असे वाटू लागले की लग्न, शिक्षण, नोकरी, प्रापंचिक घालमेल हे सर्व कसे काय जमेल? याबाबत सर्वांना विचाराला चालना मिळावी म्हणून ही स्पर्धा आयोजित केली आहे.

२० ते ३० वयाच्या **अविवाहित** मुला-मुलींनी सुमारे ४००-५०० **शब्दांत** याबाबतच्या खालील विविध पैलूंचा परामर्ष घेणारे लिखाण, सुवाच्य अक्षरात (वा टंकित), **पुरेसा समास सोडून, कागदाच्या एकाच बाजूस** लिहून संपादक, हितगुज या पत्त्यावर **१५ ऑक्टोबर २००५ पर्यंत पाठवावे**. (पाकिटावर 'मला लग्न करायचय स्पर्धा' असा स्पष्ट निर्देश करावा.) रु. ५००, ३०० व २०० अशी भरघोस बक्षिसे.

**परामर्षासाठी मुद्दे** : लग्नाचे वय किती असावे (मुलांचे/मुलींचे)? एकत्र कुटुंबपद्धतीत रहावे की विभक्त व का? अर्थार्जनाचे दरवाजे कोणते? वधु-वर दोघेहि मिळवते असावे काय व का? वडिलोपार्जित इस्टेट हवी की नको? हवी असल्यास कौटुंबिक जबाबदारी हवी का नको? वडिलोपार्जित मदत घ्यावी की कर्ज घ्यावे? **आईबाबाघर** सोयीचे की **पाळणाघर**? वधू-वरांच्या स्वयं निर्णयाला प्राधान्य असावे की आईवडिलांनी आपले निर्णय लादावे? कर्ज काढून लग्न करावे काय? ज्योतिषावर विश्वास किती ठेवावा? (पत्रिका, मंगळ, ग्रहदशा इ.) एकगोत्री, भिन्न वंश व जातीतील विवाहाबाबत मत. नातेसंबंध व त्यातील लग्ने. वैद्यकीय मते व ज्योतिषांची मते (पत्रिका इ. बाबत) धार्मिक विधी असावे की नसावे? रजिस्टर लग्न योग्य की धार्मिक पद्धतीने? बुफे/जेवणावळ हवी की नको? फॅमिली प्लॅनिंग करावे काय? किती काळ? पैशाला किती महत्त्व व संसाराला किती? वधूला अगर वराला महत्त्वाचे स्थान, त्यांच्या मताला प्राधान्य.

(स्पर्धकांनी **स्वतःचे पूर्ण नांव, जन्म तारीख, शिक्षण, वडिलांचे पूर्ण नांव ही माहिती वेगळ्या कागदावर लिहून लिखाणाबरोबर पाठवावी - संपादक**) ★★★

### संमेलन स्मृति-चिन्ह




गोवा संमेलनाची आठवण कायम रहावी यासाठी **आपण हे चांदीचे स्मृति चिन्ह घेतले काय?** (१० ग्रॅम किंमत रु. २००) नसल्यास **ताबडतोब** प्रतिष्ठानच्या अध्यक्षांशी संपर्क साधावा.

मे. यशवंत विठ्ठल मराठे (प्रा.) लि. कौपिनेश्वर मंदिर, ठाणे (प.) ४००६०१.

फोन : २५३३४७३५, २५३३२२२४.

email : supriya@yvmarathe.com

**त्वरा करा... थोडीच स्मृतिचिन्हे शिल्लक.**

**मराठे प्रतिष्ठानची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार २५ सप्टेंबर, सायंकाळी ५ वाजता. सभेची नोटीस पृ.८ वर**

मराठे प्रतिष्ठान

पब्लिक ट्रस्ट नोंदणी क्र. ई. ७९१८ (मुं. ता. १२/१/१९८१)

मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५. दूरध्वनी : २४३०२४५३.

वेबसाईट : www.marathepratishthan.org

# प्रतिष्ठान वृत्त

**कार्यकारी मंडळ**

प्रत्येक महिन्याच्या **दुसऱ्या शनिवारी सायंकाळी ४ वाजता** कार्यकारी मंडळाची सभा होते. सभेच्या दिवशी कोणीहि सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी प्रतिष्ठानच्या कार्यालयात येऊ शकतो.

मागील तिमाहीत जून ११, जुलै ९ व ऑगस्ट १३ रोजी कार्यकारी मंडळाच्या सभा झाल्या. प्रतिष्ठानचे जनक वामन गणेश यांच्या विनंतीवरून **११ जूनची सभा** त्यांच्या जोगेश्वरी येथील नवीन निवासस्थानी घेण्यात आली. तसेच **जुलै ९ची सभा** पुण्यातील सदस्यांच्या विनंतीवरून पुणे येथे घेण्यात आली. या सभेला पुणे कार्यकारिणीचे सदस्य व पुण्यातील काही कुलबांधवहि उपस्थित राहिले. त्यामुळे कार्यकारी मंडळाला त्या सर्वांशी विचारांचे आदानप्रदान करण्याची व्यापक संधी प्राप्त झाली. **ऑगस्ट १३ची सभा** मुंबईत माहीम येथे रमाकांत विद्वांस यांच्या निवासस्थानी घेण्यात आली.

प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष आनंदराव अचानक उद्भवलेल्या कामामुळे पुण्यातील सभेला येऊ शकले नाहीत. त्यामुळे या सभेचे अध्यक्षस्थान प्रतिष्ठानचे कार्योपाध्यक्ष रमाकांत माधव विद्वांस यांनी स्वीकारले.

**पुण्यातील सभेत चर्चिला गेलेला महत्त्वाचा विषय म्हणजे प्रतिष्ठानची स्वत:ची वास्तुनिर्माण**. यासाठी कुलबांधवांकडून निधी गोळा करावा, निधी उभारणीसाठी सहाय्य करणाऱ्या सभासदांना होणाऱ्या वास्तूचा वापर करताना इतरांच्या मानाने सवलत देण्यात यावी, कुलबांधवांना निधीसाठी आवाहन करतानाच कार्यकारी मंडळ सदस्यांकडून ५ वर्षे मुदतीच्या किमान १ लाख रुपयांच्या बिनव्याजी ठेवी घेण्यात याव्या, परदेशांतील कुलबांधवांकडून मोठ्या प्रमाणात निधी मिळवण्याचा प्रयत्न व्हावा, ते मायदेशात येतील तेव्हा त्यांच्या तात्पुरत्या निवासाची सोय प्रस्तावित वास्तूमध्ये सवलतीच्या दराने करावी असे विचार व्यक्त करण्यात आले.

याबाबत **अमेरिकेतले आपले कुलबांधव वि. गो. ऊर्फ भाऊसाहेब यांच्याशी फोनवर बोलणे** झाल्याचे व त्यांनी तिकडून निधी जमवण्याबाबत सहकार्य करण्याचे आश्वासन दिल्याचे सांगण्यात आले. (यासंबंधीचे आवाहन - An Earnest Appeal - याच अंकात छापले आहे. पहा पृ. ५)

आज प्रतिष्ठानचे १३०० च्या वर सभासद आहेत. यापैकी **२०० सभासदांनी अपेक्षेनुसार रु. २५ हजार ठेव/देणगी दिली तरी आवश्यक तेवढे ५० लाख जमू शकतात.** यापुढील अंकात या निधीची नावनिशीवार यादी प्रसिद्ध करण्यात येईल.

**या सभेतील अन्य महत्त्वाचे निर्णय**

१. प्रतिष्ठानचा कॉर्पस फंड वाढवणे व खर्च कमी करणे यावर भर देण्यात यावा.

> ## मराठे कुलवृत्तांत उपलब्ध
>
> आपल्या कुलवृत्तांताच्या प्रती संपलेल्या आहेत. बऱ्याच कुलबांधवांकडून याबाबत विचारणा होत आहे. सबब कुलवृत्तांत (पृष्ठ संख्या ९००) झेरॉक्स करून कुलबांधवांना उपलब्ध करून देण्याचे ठरविण्यात आले आहे. एका प्रतीसाठी किंमत रु. ६००. ज्यांना प्रत हवी असेल त्यांनी रु. ६०० 'मराठे प्रतिष्ठान मुंबई' या नावाने चेक/ड्राफ्टने **त्वरित** पाठवावे. मर्यादित प्रती तयार करणार असल्याने इच्छुकांनी त्वरा करावी.
>
> **- कार्यवाह, मराठे प्रतिष्ठान.**

२. पुण्यातील कुलबांधव शरद शंकर खांबेटे यांच्या मुलाला ३० मे २००५ रोजी अपघात झाला. यासाठी वैद्यकीय खर्च भागविण्यासाठी (त्यांना मदत नको असल्याने) रु. २० हजार बिनव्याजी कर्ज तातडीने देण्यात यावे. (याचा चेक सभास्थानीच पुणे शाखेकडे देण्यात आला.) पैकी १० हजार रुपये ६ महिन्यांनी व १० हजार रुपये १ वर्षात परत करावे असेहि ठरविण्यात आले.

३. प्रतिष्ठानच्या देणग्यांना आयकर कायदा कलम ८० जी नुसार आयकरात सवलत मिळावी म्हणून ताबडतोबीने अर्ज करावा.

४. प्रतिष्ठानच्या उत्पन्नातून कापून घेण्यात आलेला आयकर परत मिळवण्यासाठी सर्व पूर्तता करून ६ महिन्यात अर्ज पाठवण्यात यावा.

५. **रद्दी विक्रीचे पैसे सभासदांनी प्रतिष्ठानकडे देणगी म्हणून द्यावे** असे आवाहन सभासदांना करावे. अशा जमा होणाऱ्या रकमांचा तपशील हितगुजच्या प्रत्येक अंकात देण्यात येईल. ( आवाहन पृ. ३)

६. परिवाराबाहेरील प्रतिष्ठानला सहाय्यभूत होऊ शकतील अशा उद्योजकांना हितगुज वर्षभर (४ अंक) प्रचारार्थ पाठवण्यात यावे. (अशा उद्योजकांची नावे व पत्ते सभासदांनी संपादक हितगुज यांना कळवावे असे आवाहन आहे. - संपादक)

**ऑगस्ट १३च्या सभेत**

**वास्तुउभारणी** निधीसाठीचे आवाहन चर्चेनंतर मान्य करण्यात आले. याचा **पाठपुरावा** करण्याची **जबाबदारी पुढील तीन सभासदांनी** घ्यावी असे ठरविण्यात आले.

१. **रमाकांत माधव विद्वांस,** कार्योपाध्यक्ष, फ्लॅट नं. ३१, गुडविल ॲश्युरन्स बिल्डींग, मनमाला टँक रोड, माहीम, मुंबई ४०००१६. फोन : २४३०५२६०, २४३२४८४०. सेल : ९८२०२२४०१४

२. **प्रभाकर दामोदर मराठे,** कोषाध्यक्ष, ८/१३, सहकार नगर, वडाळा (प.), मुंबई ४०००३१. फोन : २४१५०८८९. सेल : ९८२०२३२०८२.

३. **हेमंत महादेव मराठे,** २/१८, शिवानंद सोसायटी, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०००५७. फोन : २६१७७७५७, २६१५२८७४.

कुलबांधवांनी यासंबंधी वरीलपैकी कोणाशीही संपर्क साधावा.

गुणवत्ता पारितोषिकांसाठी १०वीला ७०% व १२वीला ६०% गुण ही पात्रता फारच कमी असल्याने ती वाढवावी अशी काही सभासदांची सूचना होती. यावर साधकबाधक चर्चा होऊन जास्तीत जास्त उत्तीर्ण विद्यार्थ्यांपर्यंत प्रतिष्ठानला पोचता यावे म्हणून आजचे पात्रतेचे निकष बदलू नये असे ठरविण्यात आले.

तसेच प्रतिष्ठानच्या माध्यमातून गट सहली आयोजित केल्यास सहल कंपन्यांकडून खर्चात सवलत मिळेल व ती रक्कम प्रतिष्ठानला मिळेल अशीहि एक सूचना विचारार्थ आली. तत्वत: याबाबत हरकत नाही, एखाद्या सहलीची निश्चित योजना आल्यास त्याबाबत विचार करता येईल असे सभेचे मत पडले.

बरेच सभासद कुलवृत्तांताची चौकशी करतात. यासाठी कुलवृत्तांताच्या सध्याच्या पुस्तकाच्या झेरॉक्स करून १० प्रती तयार कराव्या (अंदाजे खर्च ५,०००) व कुलबांधवांना आवाहन करून इच्छुकांना विकण्यात याव्या असेहि ठरविण्यात आले.

**देणग्या**

जून ते ऑगस्ट २००५ या तिमाहीत प्रतिष्ठानला पुढीलप्रमाणे देणग्या मिळाल्या :

**सभासदत्व व हितगुज वर्गणी : (प्रत्येकी रु. ३००)** - प्रसाद (विष्णू) वसंत, साखळी, गोवा आणि पुण्यातील अशोक रामचंद्र, विक्रम मधुकर व डॉ. श्रीकृष्ण नारायण (एकूण ४)

**रद्दी विक्री निधी**

प्रत्येक सभासदाने आपण विकलेल्या वर्तमानपत्रांच्या रद्दीचे पैसे प्रतिष्ठानकडे पाठवावे असे सर्वांना प्रतिष्ठानतर्फे आवाहन. एका सभासदाकडून वर्षाला १०० रुपये अशा हिशेब केला तरी १००० सभासदांचे प्रतिवर्षी १ लाख रुपये जमा होतील. आपली रक्कम मराठे प्रतिष्ठान, मुंबई या नांवाच्या ड्राफ्ट/चेकने प्रतिष्ठानकडे पाठवावी.

**शिक्षण निधी**

शकुंतला गो. नामजोशी, विलेपार्ले, मुंबई (रु. ५०१), रश्मी श्रीकांत काळे, मुलुंड, मुंबई (रु. ५००).

**वैद्यकीय मदतनिधी**

कमलाकर अनंत जाईल, पुणे (रु. ५०१), माधव वासुदेव, पुणे (रु. १०००).

**हितगुज निधी**

दिनकर रामचंद्र, गिरगांव, मुंबई (रु. १०१)

**जाहिरात (हितगुज, जून २००५)**

शैलेश सिल्व्हर पॅलेस, झवेरी बाजार, मुंबई (रु. ५०००), प्रभाकर दामोदर, वडाळा, मुंबई (रु. ६००) * * *

---

# सभासद वृत्त

**चि. मेघना उमेश फ्रान्समध्ये**

लायन्स क्लबतर्फे अनेक देशातून १८ ते २५ वयोगटातील मुलामुलींना निवडून दरवर्षी एक महिनाभर फ्रान्समध्ये मेळावा घेतला जातो. जगभरातून आलेल्या या तरुणतरुणींना मैत्रीच्या नात्यात बांधणे ह्या त्यामागचा उद्देश. या मेळाव्यात अनेक परिषदा, चर्चासत्रे, संशोधन सत्रे घेतली जातात. शिवाय बौद्धिक व नैतिक पातळीवर सामूहिक कामे करण्याची संधी त्यांना दिली जाते. त्याकरता अनेक सांस्कृतिक कार्यक्रम, खेळ इत्यादी आयोजित केले जातात.

यंदा (२००५ साली) हा कार्यक्रम १ ते ३१ जुलै या कालावधीत फ्रान्समधे ५ केंद्रात आयोजित करण्यात आला. त्याकरता मुंबईतून गिरगावातील REINET या तांत्रिक शिक्षण देणाऱ्या अगदी जुन्या संस्थेचे डायरेक्टर **उमेश धुंडिराज (पृ.१३४) व सौ. संजीवनी यांची कन्या कु. मेघना** हिची निवड झाली असून ती १ जुलै रोजी पॅरिसला गेली. तिचे फ्रेंच भाषेचे ज्ञान उत्तम आहे. मुंबईच्या आलियाँस फ्राँसेझ (Alliance Francaise) या संस्थेकडून घेतल्या जाणाऱ्या १, २, ३ लेव्हल परीक्षेत ती पहिली आली आहे. त्यामुळे संस्थेच्या डायरेक्टरनी तिची शिफारस केली.

कॉम्प्युटर इंजिनीयरिंग मधीलहि तिची प्रगती प्रशंसनीय आहे. शाळेपासून तिची अनेकविध कार्यक्षेत्रे होती. ती हेडगर्ल, क्रिकेट कॅप्टन, वक्तृत्वकलेत निपुण, मुलींना व शिक्षकांना प्रिय असणारी होती. (प्रेषक: **शालिनी धुंडिराज**, ताडदेव, मुंबई)

**६३ वर्षांचा विद्यार्थी - वामन गणेश**

प्रतिष्ठानचे जनक **वामन गणेश (पृ.५०३)** यांनी निवृत्तीनंतर आता ६३व्या वर्षी पुन्हा विद्यार्थीदशेत प्रवेश केला आहे. त्यांनी मुंबई विद्यापीठाच्या 'पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन ह्यूमन राईट्स' या परीक्षेचा अभ्यास सुरू केला आहे. यासाठी त्यांनी **'पाणी' या विषयावर लिहिलेला प्रबंध विद्यापीठाने मान्य केला** असून आता त्यांनी या परीक्षेसाठी द्यावयाच्या तीन पेपरांचा अभ्यास चालू केला आहे. साठींतल्या या विद्यार्थ्याला परीक्षेतील यशाबद्दल आपण सर्व शुभेच्छा देऊया!

**तीन पिढ्या एकत्र चार्टर्ड अकौंटंट**

नोव्हेंबर २००४ मध्ये झालेल्या चार्टर्ड अकौंटंटच्या परीक्षेत उत्तीर्ण होऊन **बेळगांव येथील कुलबांधव निखिल आनंद** (पृ.४७५) यांनी त्यांचे वडील (वय ५४) आणि आजोबा सदाशिव रघुनाथ (वय ८२) यांच्या बरोबर त्यांच्या CA च्या फर्ममध्ये प्रॅक्टिस करायला सुरवात केली. एकाचवेळी तीन पिढ्यांनी एकत्र CA म्हणून व्यवसाय करण्याचा हा एक विक्रमच मानावा लागेल. आम्ही अनेक चार्टर्ड अकौंटंट्सकडे चौकशी केली असता असे दुसरे उदाहरण कळू शकले नाही. (**प्रेषक: श्रीपाद नारायण**, पृ.५३८, बेळगांव)

**युवा पत्रकार संजय खांबेटे**

म्हसळा, जि. रायगड येथे गेली वीस वर्षे पत्रकारिता करत असलेले म.प्र. चे **सभासद संजय केशव खांबेटे** (पृ.८६६) यांना रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघातर्फे देण्यात येणारा रामनारायण युवा पत्रकार पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. म्हसळा तालुका हा दुर्गम तालुका आहे. विकास खऱ्या अर्थाने या तालुक्यापर्यंत अजून पोचलेलाच नाही. अशा या तालुक्याच्या समस्या निर्भीडपणे मांडण्याचे काम संजय खांबेटे यांनी पत्रकारितेच्या माध्यमांतून सातत्याने केले. एखाद्या प्रश्नावर लिहिले की शेवटपर्यंत त्याचा पाठपुरावा करणे ही त्यांची खासियत आहे.

विशेष म्हणजे बिल्डींग मटिरियल व स्टेशनरी सामानाचा आपला व्यापार सांभाळून ते पत्रकारिता करतात. तालुक्यातील सामाजिक व सांस्कृतिक संस्थांतहि ते सक्रिय सहभाग घेतात. (**प्रेषक: नरेंद्र केशव**, पृ.८६५, पुणे)

**शीला पाटणकरांच्या जीवनस्पर्शी कथा**

पुण्यातील प्रतिष्ठानचे सभासद विंग कमांडर **यशवंत लक्ष्मण (पृ.१०१) यांची बहीण सौ. शीला पाटणकर** यांनी लिहिलेल्या कथा माहेर, ललना, प्रपंच अशा लोकप्रिय मासिकांतून प्रसिद्ध होतात. त्यांच्या निवडक कथांचे चार कथासंग्रह - विश्वस्त, पत्र लिहिण्यास कारण की, त्या तिथे तिकडे पलिकडे आणि निर्धार - नुकतेच अकोल्याच्या पराग एजन्सीने प्रकाशित केले आहेत. स्त्री-जीवनाचे अनेक पैलू या कथांमधून हळुवारपणे उलगडलेले दिसतात. शहरी कुटुंबातील स्त्रियांप्रमाणेच खेड्यांतील किंवा लहान गावातील स्त्रियांचे प्रश्न, त्यांची विचाराची पद्धत या कथांतून जाणवते.

यातील बहुतेक कथा मध्यमवर्गीय ललनांच्या जीवनावर आधारित आहेत. त्या कथांतील व्यक्ती आपल्या आजूबाजूच्या ओळखी-अनोळखी घरातील आहेत आणि त्या आपल्या जीवनातील अनोखे कप्पे उघडून दाखवत आहेत असे वाटते. (**प्रेषक: माधव वासुदेव**, पृ.३८६, पुणे)

[illegible]

पुण्यातील सभासद **विजय भालचंद्र यांचा मुलगा भालचंद्र (आनंद)** (पृ.३९०) याचा विवाह योगिनी परांजपे हिच्याशी पुण्यात १६ जून २००५ रोजी थाटामाटात पार पडला. नवविवाहितांचे मराठे परिवारातर्फे अभिनंदन.

[illegible]

**चुकीची दुरुस्ती** - मागील (जून २००५) अंकांत सहवेदनामध्ये मुकुंद गोपाळ यांचे निधन झाल्याचे चुकीने छापण्यात आले होते. त्याऐवजी कृष्ण गोपाळ (पृ.७५१) वय ७८ असे वाचावे.
- संपादक

१. मराठे प्रतिष्ठानचे सदस्य **रघुनाथ बाळकृष्ण** (प.५२०), बेळगांव यांचे २९ मे २००५ रोजी दु:खद निधन झाले. ते ७८ वर्षांचे होते. बेळगांवमधील मुलांच्या शाळेचे मुख्याध्यापक म्हणून निवृत्त झाल्यानंतर ते बेळगांव येथील 'तरुणभारत' मध्ये संपादकीय विभागात दीर्घकाळ कार्यरत होते. ते हिंदी साहित्यरत्न व राष्ट्रभाषा प्रचारकहि होते. बिंबल, गोवा हेच त्यांचे मूळ गांव. या संमेलनात ज्येष्ठ कुलबांधवांच्या सत्कारप्रसंगी यांचाहि सत्कार करण्यात आला होते. (ऐन वेळी प्रकृति बिघडल्यामुळे ते येऊ शकले नाहीत म्हणून त्यांच्यावतीने त्यांच्या चुलतभावाने हा सत्कार स्वीकारून त्यांच्यापर्यंत पोचवला.)

**खुषीपत्रे**

१. आजच रौप्यमहोत्सवी विशेषांक मिळाला. फारच छान वस्तुनिष्ठ आहे. आम्हा उभयतांच्या आठवणींना परत उजाळा मिळाला. आपण सोलापूरहून मोटर सायकलवर आलेल्या कुलबांधवांचा खास उल्लेख केला - आपले किती बारीक लक्ष असते ह्याचा पुरावाच जणू!
**- मनोहर दामोदर** (पृ.२७५), अंबरनाथ

२. महाराष्ट्रांत मुसळधार पावसाने हाहा:कार माजवला होता. अचानक एके दिवशी गोव्याहून सौ. अपूर्वा अरुण यांचा फोन आला. त्यांनी आस्थेने इकडील महापुराची अगत्यपूर्वक चौकशी केली. गोव्यातील माणसांच्या अगत्याचे त्यामुळे कौतुक वाटले.
**- चिंतामणि त्र्यंबक** (पृ.२४८), कळवा, जि. ठाणे

२. **आदर्श माता राधाबाई बाळकृष्ण** : प्रतिष्ठानचे **संस्थापक सदस्य कालिदास बाळकृष्ण यांची आई राधाबाई** (पृ.५२०) यांचे १४ जुलै २००५ रोजी वयाच्या ७९व्या वर्षी निधन झाले. मराठे प्रतिष्ठानतर्फे १९९८ मध्ये जाहीर केलेल्या आदर्श माता पारितोषिकाच्या त्या मानकरी ठरल्या होत्या. (परिचय लेख पहा: हितगुज, मार्च १९९८)

वयाच्या अवघ्या २३व्या वर्षी त्यांच्या पतीचे निधन झाले. पदरात तीन मुले - वय ५ वर्षे, ३ वर्षे आणि १० महिने. त्यांना घेऊन बेळगांवात गेल्या. पेपरमिटच्या कारखान्यात नोकरी, घरी शिवणकाम इत्यादि करून त्या व्ह. फा. झाल्या.

कानडी भाषेमुळे बेळगांवात नोकरी मिळणे कठीण. गोव्यात पोर्तुगीज राजवट - तिथेहि मराठी शाळा नाही. मराठवाड्यात, नांदेड जिल्ह्यात 'शिक्षिका पाहिजे' अशा जाहिरातीनुसार अर्ज करून नोकरी मिळवली. विद्यार्थीप्रिय शिक्षिका तर त्या झाल्याच; पण गावातल्या लोकांचाहि विश्वास व प्रेम संपादन केले. स्वावलंबनाने तीन्ही मुलांना चांगले शिक्षण दिले पण त्यापेक्षा अधिक मोलाचे म्हणजे स्वाभिमान, सामाजिक बांधिलकी आणि संकटांनी डगमगून न जाण्याचे खरेखुरे जीवन शिक्षण त्यांनी आपल्या मुलांना दिले.

आदर्श माता पुरस्काराला प्रतिसाद म्हणून राधाबाईंनी प्रतिष्ठानला लिहिले होते ''परिस्थितीवर मात करून संकटसमयी खंबीरपणे सारासार विचार करून योग्य निर्णय घेण्याचे संस्कार आईकडून मला मिळाल्यामुळे सामाजिक बांधिलकी सांभाळून सर्व तऱ्हेच्या संकटांना मी तोंड देऊ शकले!!''

आईकडून मिळालेले हे संस्कार आपल्या मुलांमध्येही उतरविण्यात ही आदर्श माता यशस्वी झाल्याचा प्रत्यय नुकत्याच झालेल्या गोवा संमेलनात आला. आपली आई अंथरुणावर खिळून आहे, कोणत्याहि क्षणी काहीही होऊ शकेल अशा अवस्थेत आहे, अशा परिस्थितीतहि कालिदास मराठे यांनी त्यांच्या या मन:स्थितीचा मागमूसहि कोणाला लागू नये इतक्या निर्विकारपणे दोन दिवस संमेलनात सहभागी होऊन प्रमुख आयोजक म्हणून आपली सामाजिक जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. त्यांच्या आईने केलेल्या संस्कारांचेच हे फलित नव्हे काय?

सर्व मराठे परिवारीयांतर्फे या आदर्श मातेला प्रणाम आणि त्यांना सद्गति लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना.

३. कळविण्यास अतिशय दु:ख होते की माझे चुलते **धुंडिराज जयराम** तथा बाळ (पृ.४७) यांना २९ मे २००५ रोजी वयाच्या ८७व्या

# AN EARNEST APPEAL TO MARATHE PARIVAR

There comes a stage in the life of an individual or an organization, when the need to accelerate is felt more strongly than ever. This time has come in the life of Marathe Pratishthan now.

**Pratishthan** has done admirable work. It has completed the noteworthy project of **'Marathe Kulvrittanta'**, has tenaciously published our popular house magazine **'Hitguj'** for over 25 years, has been successfully running **scholarship programme** for student, has been instrumental in extending **medical** and various other schemes that are in the nature of **religious and social uplift** of the **Marathe Parivar.** This yeoman work has accomplished the important task of bringing together the social fabric of Marathe Parivar, in the form of "MARATHE PRATISTHAN".

Presently, all activities of the Pratisthan are carried out from the office of Swifts Ltd., Marathe Udyog Bhavan, under the auspices of Smt. Sulabhatai Marathe - wife of Late Shri. Sureshbhau Marathe - Founder of the Marathe Pratisthan. To avoid inconvenience to Swift's operations, the Pratisthan has been traditionally restricting its activities at their office, only to holidays.

### Requirements

The programmes like small get-togethers, quiz competitions, art and craft competitions and vacation classes etc. that would motivate the Youth to actively participate in the **activities of the Pratishthan necessarily require** the Pratisthan to have **its 'own place'** and enough funds to conduct these activities. Another need of the day is availability of decent temporary **transit accommodation at Mumbai, at reasonable charges.** Once such facility is created and such activities are started, they should continue as self-financing propositions.

In addition to the space required by the Pratisthan for conducting activities of interest to the Youth, it should take a couple of fully furnished, self-contained living rooms and a small equipped common kitchen with a round-the-clock attendant and make them available to the Members at reasonable rates.

With a view to achieve this objective, the **Pratishthan has taken a decision to buy its own premises in some decent locality in one of the well developed suburbs of Mumbai, within a reasonable time frame of 12-14 months. Approximate cost of this project is likely to be in the region of Rs.50 lakhs.**

### Funding

Most of the funds available with the Pratisthan are for specified end-use. Therefore, if this dream is to see the light of the day, then raising funds from every possible source is the only solution. As a modest beginning a few Members of the present **managing committee have promised to contribute a sum of Rs.25,000/- each,** by 30th September 2005. **What is required from all of you, to meet our goal, is generous contributions.**

It is estimated that over 100 families from the Marathe Parivar have settled in Europe, Canada and North America. There are a few families that have settled in West Asian and South East Asian countries also. Most of them are well settled and well to do. If such families decide to spare a small percentage of their one year's earnings, the Pratisthan would be able to meet a major portion of the funds required for the project. In India, the Pratisthan has over 1000 Families as its members. With the help of all, the Pratisthan would be able to easily reach its target.

If the Pratisthan buys a decent three bedroom + hall + kitchen apartment, having Carpet Area of about 100 sq.m., in a decent locality like the Hiranandani Gardens at Powai or in an area like Andheri [East] or Vileparle [East], which is **within easy reach of the International and the Domestic Airports** and is easily accessible, round the clock, by public

---

*सभासद वृत्त.... (मागील पानावरून)*

वर्षी वार्धक्य व दीर्घ आजाराने देवाज्ञा झाली.

मी व माझे दोन लहान भाऊ यांचा अतिशय प्रतिकूल परिस्थितीत सांभाळ व पालनपोषण हे काका व काकू सुशीला (१५-९-९८ रोजी दिवंगत) यांनी पुत्रवत केले व म्हणूनच आम्ही तिघे भाऊ आज सुस्थितीत आहो. चार मुले सुस्थितीत असून या आधारपटाने घालून दिलेला कौटुंबिक समांजस्याचा वसा आम्ही सर्व भावंडे यापुढेही चालवू हीच खऱ्या अर्थाने प्रिय काकांना श्रद्धांजली ठरेल. (प्रेषक : भास्कर नरहरी, पृ.४६, रत्नागिरी)

४. प्रतिष्ठानचे कल्याणमधील सभासद **नरहरी मुकुंद यांचे वडील नारायण** (पृ.४०६) यांचे ८ ऑगस्ट २००४ रोजी दुःखद निधन झाले.

५. मराठे प्रतिष्ठानच्या **गोव्यातील संमेलनाच्या कार्यवाह अपूर्वा अरुण (पृ.५३१) याची आई सुमती हरी जोशी** यांचे दिनांक ४ जून २००५ रोजी हल्याळ येथे निधन झाले. विशेष म्हणजे त्या माहेरच्या मराठे होत्या (जयलक्ष्मी कृष्णराव)

६. बेळगांवमधील प्रतिष्ठानचे सभासद **विठ्ठल यशवंत (पृ.५२५), यांची पत्नी वंदना** हिचे ६ ऑगस्ट २००५ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.

७. औरंगाबाद येथील कुलबांधव वसंत दत्तात्रय (पृ.२८०) यांचे २६-७-२००५ रोजी दुःखद निधन झाले. गेली ६-७ वर्षे ते किडनीच्या विकाराने आजारी होते. मृत्यूसमयी त्यांचे वय ६९ वर्षे होते. राधानगरी, औरंगाबाद, नांदेड अशा विविध पॉलीटेक्निक कॉलेजमध्ये त्यांनी अध्यापनाचे काम केले. ते अतिशय अभ्यासू वृत्तीचे होते. निवृत्त झाल्यावर टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या परीक्षा घेण्याचे काम औरंगाबाद येथे ते स्वतंत्रपणे सांभाळत होते. त्यांच्यामागे पत्नी व दोन विवाहित मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. (**प्रेषक: सौ. नीलांबरी रमेश**, पृ.२८०, पुणे)

**वरील सर्व मृतांच्या कुटुंबीयांच्या दुःखात मराठे परिवार सहभागी आहे.**

***

conveyance system and decently furnishes the place, it would cost around Rs. 50 lakhs.

One of the bedrooms would be kept by Pratishthan for use as its office, for our regular monthly meetings and for rendering consultancy services to needy businessmen for a reasonable fee The hall would be used for conducting get-togethers, competetions, etc., for the Youth and would be given on hire to the Members for small functions. The hall could also be used as a common sitting room. This will provide regular revenue to Pratishthan.

The other **two Bedrooms which would be fully furnished, self-contained, air-conditioned rooms like the living rooms of a first class hotel,** would be made available to the Members, as temporary transit accommodation, at reasonable rates. **The common kitchen will be self-service type** and will be equipped with a fridge and other kitchen gadgets etc. The facility will have a round-the-clock attendant.

**Benifits to Members**

The Pratisthan is certainly not asking you for these contributions without getting anything in return. **See what you stand to gain.**

A. Members who make an interest-free Deposit of Rs.25,000/- [i.e. say U.S.$ 600] for a period of 12 years, would get 3 days entitlement to a room per year @ Rs.1,250 per day.

B. Members who donate Rs.25,000/- [i.e. say U.S.$ 600] would get 3 days entitlement to a room per year @ Rs.1,000/- per day.

C. Families could take more than one Memberships to increase their entitlement to the rooms or could avail of extended stay for more than 3 days in a year, if rooms are vacant.

With this, the Pratisthan would be in a position to maintain the Temporary Transit Facility nicely and to repay the Deposits in 12 years and still have a nominal surplus amount.

**This facility, appropriately called Temporary Transit Accommodation will be a boon to the members of the Marathe Parivar, visiting Mumbai and coming from abroad/going abroad.**

I am sure you will whole-heartedly decide to make your contribution for this worthy cause. Before the Pratisthan proceeds further in the matter, I would request you to kindly **let the Pratisthan have your response and suggestions on the following points :**

1. Your reactions to and suggestions in respect of the proposed project.
2. Your suggestions regarding the location of the proposed facility.
3. Your choice - Depositor or Donor.
4. Your suggestions regarding the amenities to be provided.

You must have noticed that addresses of families within the Marathe Pariwar (i.e. Marathe, Chakradev, Vidwans, Khambete, Joshi, Phadnis and Jaeel) are being published in Hitguj.

I request you to use your personal communication with families known to you and the families in your area, in persuading them to come forward to make their contribution..

With warm regards,

For Marathe Pratishthan
**Anand Marathe**
Chairman

***

*मातोश्री मंदाकिनी दामोदर*

यांच्या द्वितीय स्मृतिदिनानिमित्त (२४ ऑगस्ट)

पुण्यस्मरण

**श्री. प्रभाकर दामोदर (कोषाध्यक्ष), (पृ.१२०)**

मराठे प्रतिष्ठान, वडाळा, मुंबई ४०० ०३१.





**सौ. राधाबाई बाळकृष्ण**

(डिसेंबर १९२६ ते १४-७-२००५)

ती. आईस -

*तव स्मरण सतत स्फूर्तिदायी घडो*

श्री. कालिदास बाळकृष्ण, सौ. सुनंदा कालिदास, सौ. कांचन, सौ. अर्चना, चि. बाळकृष्ण,
श्री. शशिकांत बाळकृष्ण, सौ. प्रतिभा शशिकांत, सौ. कीर्ति, चि. तृप्ती, चि. संतोष

# मराठे प्रतिष्ठान

(सार्वजनिक विश्वस्त नोंदणी क्र. ७९१८(मुं.) दि.१२.१.८१)
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.
दूरध्वनी : २ ४३० २४५३; फॅक्स : ९१-२२-२ ४३७ ९८६३.

## २३ वा वार्षिक अहवाल व हिशेब पत्रके

(१ एप्रिल २००४ ते ३१ मार्च २००५)

### ●वार्षिक सर्वसाधारण सभा●

रविवार दि. २५ सप्टेंबर २००५, सायंकाळी ५.०० वा.

**❖सभास्थान❖**

दामले योग केंद्र सभागृह, मनमाला टँक रोड,
लोकमान्य नगरजवळ, माटुंगा रोड (प.रे.) मुंबई ४०० ०१६

### ● विश्वस्त मंडळ ●

| | | दूरध्वनी | वास्तव्य | कु.वृ.पृष्ठ |
|---|---|---|---|---|
| १. श्री.आनंद यशवंत मराठे | विश्वस्त-कार्याध्यक्ष | २ ५४२ ५५२४ | ठाणे-प. | २७७ |
| २. श्री.अरविंद दामोदर मराठे | विश्वस्त | ९५२५१ २४७ ०६७७ | डोंबिवली-पू. | २९२ |
| ३. डॉ.राजेंद्र विठ्ठल मराठे | विश्वस्त | २ ५४२ १८९१ | ठाणे-प. | २९१ |
| ४. श्री.सतीश काशिनाथ मराठे | विश्वस्त | २ ४४५ ८९४६ | दादर-प.,मुंबई | १२९ |
| ५. श्रीम.सुलभा सुरेश मराठे | विश्वस्त | २ ४४४ ३०७४ | दादर-प.,मुंबई | ३९९ |

### ● कार्यकारी मंडळ ●

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. श्री.आनंद यशवंत मराठे | विश्वस्त-कार्याध्यक्ष | २ ५४२ ५५२४ | ठाणे-प. | २७७ |
| २ श्री.रमाकांत माधव विद्वांस | कार्योपाध्यक्ष | २ ४३० ५२६० | माहीम, मुंबई. | ६२३ |
| ३ श्री.मोहन सदाशिव मराठे | कार्यवाह | २ ६४६ ४३५१ | खार-प., मुंबई. | ३६५ |
| ४. श्री.हेमंत अरुण मराठे | सहकार्यवाह | ९५२५० २४३ ३०३८ | नालासोपारा. | ०२१ |
| ५ श्री.प्रभाकर दामोदर मराठे | कोषाध्यक्ष | २ ४१५ ०८८९ | वडाळा, मुंबई. | १२० |
| ६. श्री.विनायक केशव मराठे | सभासद | २ ४४४ ३३२९ | वरळी, मुंबई. | ०२० |
| ७. श्री.लक्ष्मण शंकर मराठे | सभासद | २ ५६८ ०१०४ | मुलुंड-पूर्व,मुंबई | ५२० |
| ८. श्री.सीताराम गोपाळ खांबेटे | सभासद | २ ६८३ ६९९४ | अंधेरी-पूर्व,मुंबई. | ६७६ |
| ९.श्री.प्रमोद कृष्ण मराठे | सभासद | २ ५४७ ७५११ | ठाणे | ३७६ |
| १०.श्री.हेमंत महादेव मराठे | सभासद | २ ६१७ ७७५७ | विलेपार्ले-पूर्व, मुंबई | ४७१ |
| ११.श्री.चिंतामण महादेव मराठे | सभासद | २ ४१५ ५३९० | परळ,मुंबई. | २२२ |
| १२.सौ.अदिती यशवंत मराठे | सभासद | २ ४४४ ९२७४ | माहिम, मुंबई. | ३९९ |
| १३.श्री.पुष्कराज वामन मराठे | सभासद | २ ८२६ ९४०२ | जोगेश्वरी-पू. मुंबई. | ५०३ |
| १४.सौ.सुमेधा प्रभाकर मराठे | सभासद | २ ४१५ ०८८९ | वडाळा, मुंबई. | १२० |
| १५.श्री.कौस्तुभ सुरेश मराठे | सभासद | ९५२५१ २४९ ४९५७ | डोंबिवली-पू. | ०८७ |
| १६.श्री.अरुण दत्तात्रय मराठे(पुणे) | सभासद | ९५२०२ ४४७ ३२८१ | पुणे. | ०६१ |
| १७.श्री.अरविंद दामोदर मराठे | विश्वस्त-कायम निमंत्रित | ९५२५१ २४७ ०६७७ | डोंबिवली-पू. | २९२ |
| १८.श्री.यशवंत सुरेश मराठे | कायम निमंत्रित | २ ४४४ ९२७४ | माहिम, मुंबई. | ३९९ |
| १९.श्री.वामन गणेश मराठे | कायम निमंत्रित | २ ८२६ ९४०२ | जोगेश्वरी-पू. मुंबई. | ५०३ |
| २०.श्री.सुरेश गोविंद मराठे | कायम निमंत्रित | ९५२५१ २४९ ४९५७ | डोंबिवली-पू. | ०८७ |
| २१.सौ.नीलांबरी रमेश मराठे | कायम निमंत्रित | ९५२०२ ४४५ ६२७० | पुणे | २८० |

**बँकर्स**

सारस्वत बँक, प्रभादेवी,मुंबई
यूको बँक, टिळक रोड,पुणे

**लेखा-परीक्षक**

चंद्रकांत वामन मराठे,ठाणे (सनदी लेखापाल)

# मराठे प्रतिष्ठान

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

मराठे प्रतिष्ठानची तेविसावी वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार दि.२५ सप्टेंबर २००५ रोजी सायंकाळी ५.०० वा. दामले योग केंद्र सभागृह, मनमाला टँक रोड, लोकमान्य नगरजवळ, माटुंगा रोड (प.रे.) मुंबई ४०० ०१६** येथे आयोजिली आहे. सभेनंतर २००४-२००५ या शैक्षणिक वर्षाच्या गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांसाठी पारितोषिक वितरणसमारंभ होईल. तरी सर्व सभासदांनी अगत्यपूर्वक उपस्थित राहावे ही विनंती.

### सभेपुढील कामे

१) दि.७ डिसेंबर २००३ रोजी झालेल्या एकविसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून मंजूर करणे.

२) दि.३१ मार्च २००५रोजी संपलेल्या वर्षाचा कार्यकारी मंडळाचा अहवाल, ताळेबंद व जमाखर्च संमत करणे.

३) सन २००४-२००५ साठी हिशेब तपासनीसांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन निश्चित करणे.

४) सभासदांकडून आलेल्या पत्रांवर, प्रस्तावांवर तसेच प्रतिष्ठानच्या भावी कार्यक्रमांवर विचार विनिमय करणे.

५) अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या कामांचा विचार करणे.

कार्यकारी मंडळाच्या आदेशावरून

मोहन सदाशिव मराठे
कार्यवाह

१ सप्टेंबर २००५

### *टीपा*

*१) गणसंख्येच्या अभावी ही सभा तहकूब झाल्यास ती पुन्हा त्याच दिवशी सायंकाळी ५.३० वा.त्याच ठिकाणी भरेल आणि या सभेला गणसंख्येचे बंधन राहणार नाही.*

*२) वार्षिक अहवाल व हिशेब पत्रके सोबत दिली आहेत.त्याबद्दल काही खुलासा हवा असल्यास सभेच्या दिवसा अगोदर समक्ष किंव पत्राने विचारावा.*

*३) प्रतिष्ठानच्या कार्याबद्दल काही प्रस्ताव,ठराव किंवा सूचना करावयाच्या असल्यास सभासदांनी त्या सभेच्या दिवसा अगोदर कार्यालयातपाठवाव्यात*

*४) सभेला येताना या अहवालाची प्रत सोबत आणावी.*

*५) सभेनंतर होणाऱ्या पारितोषिक व प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमासाठी संबंधित सर्व गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना वेगळ्या पत्राने निमंत्रणे पाठविली आहेत. किमान मुंबई - ठाणे परिसरातील विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून आपापले पारितोषिक व प्रमाणपत्र स्वतः घेऊन जावे ही आग्रहाची विनंती.*

*७) सभेनंतर अल्पोपाहाराची व्यवस्था केली आहे*

# मराठे प्रतिष्ठान

## तेविसावा वार्षिक अहवाल व हिशेब पत्रके

(१ एप्रिल २००४ ते ३१ मार्च २००५)

**सभासद बंधू भगिनीनो,**

मराठे प्रतिष्ठानच्या दि. ३१ मार्च २००५ रोजी संपलेल्या वर्षाचा म्हणजेच तेविसावा वार्षिक अहवाल कार्यकारी मंडळ सादर करीत आहे.

**सभासद**

वृत्तांतसाली आजीव सदस्य संख्या (१३११) २२ ने वाढून १३३३ झाली (पैकी ११५१ हयात आहेत). आश्रयदाता संख्या (१७) १ ने वाढून १८ झाली (पैकी १४ हयात आहेत). हितचिंतक संख्या (७) व सन्माननीय सदस्य संख्या (३) कायम राहिली. शिवाय हितगुज तहहयात वर्गणीदार संख्या (९९०) २२ ने वाढून १०१२ पर्यंत पोहोचली.(पैकी ९४७ हयात आहेत)

प्रतिष्ठानच्या आजीव सदस्यत्वासाठी किमान रु. १०० व हितगुजची तहहयात वर्गणी रु. २०० प्रत्येक स्वतंत्र कुटुंबप्रमुखाने आमचे कडे पाठवून प्रतिष्ठानला सहकार्य करावे. यासाठीच्या अर्जाचा नमुना या अहवालात अन्यत्र दिला आहे (परिशिष्ठ अ).

**वार्षिक सर्वसाधारण सभा**

प्रतिष्ठानची बाविसावी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. १० ऑक्टोबर २००४ रोजी सकाळी ९.३० वा. अ.भा. कीर्तन संस्था सभागृह, डी.एल.वैद्य रोड, दादर(प.), मुंबई ४०००२८ येथे भरली होती. प्रतिष्ठानचे विश्वस्त-अध्यक्ष श्री. अरविंद दामोदर मराठे यांनी सर्वानुमते सभेचे अध्यक्षपद भूषविले. सभासदांची उपस्थिती (३१) साधारण होती. कदाचित काही भागामध्ये पोष्टाच्या दिरंगाईमुळे अहवाल उशिरा मिळाल्यामुळे उपस्थितीवर परिणाम झाला असावा.

मराठे परिवारातील विशेष उल्लेखनीय यश मिळविलेल्या काही व्यक्तींच्या गौरवास्पद कामगिरीची अध्यक्षांनी नोंद घेऊन त्यांना अधिकाधिक यशासाठी सदिच्छा व्यक्त केल्या. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी सांप्रतच्या काळातील अनेक सामाजिक व कौटुंबिक समस्यांच्या संदर्भात समुपदेशनाची आवश्यकता या विषयावर भर देऊन हे कार्य सुरू करण्याची त्यांची मनीषा व्यक्त केली. या कामासाठी परिवारातील मध्यमवयीन व ज्येष्ठ सदस्यांनी सुद्धा स्वयंस्फूर्तीने पुढे येण्यासाठी आवाहन केले. तसेच तरुणांनी प्रतिष्ठानच्या कार्यामध्ये रस घ्यावा असा कळकळीचा उपदेश केला. शेवटी कार्यव्यस्ततेमुळे प्रतिष्ठानच्या कार्यकारिणीपासून काही काळ अलग व्हावे लागत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. अध्यक्षांच्या या भावनेशी सहमत होताना प्रतिष्ठान त्यांच्या आतापर्यंतच्या कार्यासाठी सदैव ऋणी आहे व यापुढेही त्यांचे मार्गदर्शन मिळत राहील असा विश्वास व्यक्त करीत आहे.

अहवालसाली परिवारातील अनेक व्यक्तींनी विशेष यश संपादन केल्याचे कळविले आहे व ते आपण मानसन्मान या सदरात वेळोवेळी हितगुजमध्ये प्रसिद्ध केले आहे. त्यांतील काही विशेष उल्लेखनीय नोंदी येणेप्रमाणे:

१.**डॉ.सुरेंद्रनाथ गणेश**(पृ.२८४) यांच्या "Atoms, Radioactivity and Nucflear Power" या विषयावरील विद्वत्तापूर्ण पुस्तकाचे प्रकाशन.(संपर्क फोन-२५११३८५३)

२.**दीप्ती लक्ष्मण मराठे** (पृ. ५२०) यांना मुंबई विद्यापीठाची डॉक्टरेट:

प्रबंधाचा विषय-"Liposomal Drug Delivery for Enhanced Citoxicity in Cancer Therapy"

३.चंद्रशेखर चिंतामण(पृ. २४८), कर्नाळा अभयारण्याचे वनक्षेत्रपाल यांना मुंबई विद्यापीठाची डॉक्टरेटः प्रबंधाचा विषय-" Contributions to the Flora of the Fansad Wild Life Sanctuary"

४. विश्वनाथ सीताराम(पृ.५२०) यास गोवा मेडिकल कॉलेजमधून M.D

५.सौ.अनुराधा मराठे (पृ.२९७) यांना बालगंधर्व स्मृतिदिनानिमित्त सन २००४ चा मालती पांडे स्मृति पुरस्कार प्रदान.

६.अक्षय अरुण (पृ.४६७) याची भारतीय भूदलातील इंजिनियरिंग शाखेतील कमिशनसाठी निवड. याला कर्नल प्रमोदन प्रभाकर मराठे,(पृ.३८८) पुणे यांनी मार्गदर्शन केले होते.

७. सौरभ सुरेश( पृ.८७),प्रतिष्ठान च्या कार्यकारिणीचे सदस्य हे सन २००४ च्या चार्टर्ड अकाउंटंट परीक्षेत उत्तीर्ण.

८.डॉ.स्मृति जयंत (पृ.६२३)विद्वांस (विवाहोत्तर नाव-सौ.स्मृति रोहित खरे) यांच्या कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीमधील क्षयरोग प्रतिबंधास उपयोगी शोध निबंधासाठी त्यांना अमेरिकेतील टेक्नॉलाजी रिव्ह्यू मासिकाने सन २००४ च्या १०० तरुण संशोधकांमध्ये समाविष्ट करून गौरविले आहे.

९.अरविंद वासुदेव (पृ,३१८)-चिंचवड येथील इंजिनियरिंग कारखान्याचे संचालक यांना रोल बेंडिंग मशीनसाठी जागतिक पेटंट मिळाले आहे.

१०.सुशांत हेमंत (पृ. ४७१) याची १९ वर्षाखालील भारतीय क्रिकेट संघाच्या एकदिवशी सामन्यासाठी उपकर्णधार म्हणून निवड झाली.

११.सौ.दीपा मंगेश (पृ.२९२) यांची मार्च २००५ मधील विश्वचषक स्पर्धेसाठी भारतीय महिला क्रिकेट संघामध्ये निवड झाली. या स्पर्धेतील दक्षिण आफ्रिकेतील दौरा यशस्वी झाला होता.

१२. कु. माधुरी सदाशिव (पृ. ३७०), हिला सामाजिक क्षेत्रात निरलसपणे कार्य करणाऱ्या महिला कार्यकर्त्याना देण्यात येणारा, ठाणे येथील भारतीय जीवन विकास परिषदेचा लक्ष्मीबाई केळकर पुरस्कार देण्यात आला.

१३.कु.श्रद्धा रामचंद्र (पृ.५३५) ही मुंबईच्या जे.जे.स्कूल ऑफ आर्किटेक्चर मधून मे २००५ ची बॅचलर ऑफ आर्किटेक्चर ही परीक्षा प्रथम श्रेणीत गुणवत्तापूर्वक उत्तीर्ण झाली.

१४.श्री. श्रीधर केशव (पृ. ३९६) -वेंगुर्ल्याच्या "साप्ताहिक किरात" चे संपादक यांच्या "किरात दिवाळी अंक २००४ " ला ठाणे येथील इंडियन आर्ट, कल्चर अँड टॅलंट डेव्हलपमेंट सेंटर या संस्थेने आयोजित केलेल्या दिवाळी अंक स्पर्धेत विशेष साहित्यसेवा पुरस्कार मिळाला.

•

वरील व्यक्तींप्रमाणेच ,किंबहुना याहूनहि अधिक उज्ज्वल यश संपादन करणाऱ्या परिवार मंडळींची नांवे आमच्या पर्यंत न कळविली गेल्यामुळे त्यांचा हितगुजमध्ये उल्लेख करता आला नाही व त्यामुळे अन्य कुलबांधवांपर्यंत त्यांची माहिती पोहोचू शकली नाही. याविषयीची अनास्था, संकोची वृत्ती,आळस किंवा प्रसिद्धीपराङ्मुखता झटकून सदस्यांनी आपले यश आमच्या पर्यंत वेळचे वेळी पत्राने कळविल्यास त्यांच्या अनुकरणाने इतर कुलबांधवांना स्फूर्ति मिळून सर्व परिवाराला लाभ होऊ शकेल हे सर्वांनी लक्षात घ्यावे अशी आग्रहाची विनंती आहे.

### गुणवत्ता पारितोषिकेः

वार्षिक सभेनंतर झालेल्या पारितोषिक वितरण समारंभात सन २००३-२००४ वर्षाच्या परीक्षांसाठी शिक्षणनिधीतून व अन्य योजना अंतर्गत खालील प्रमाणे ३१ विद्यार्थ्यांना गुणवत्ता पारितोषिके देण्यात आली.

| | | | |
|---|---|---|---|
| १)माध्यमिक शालांत परीक्षा | ७ | पारितोषिके -रु. | १,८५० |
| २)उच्च माध्य. शा. परीक्षा | ८ | पारितोषिके - रु. | २,३५० |
| ३)पदविका/पदवी/उच्चपदवी | ८ | पारितोषिके - रु. | २,४०० |
| ४)अन्य स्पर्धा /परीक्षा | ८ | पारितोषिके - रु. | १,८५० |
| | ३१ | एकूण - रु. | ८,४५० |

( अधिक तपशील हितगुजच्या डिसेंबर २००४ मध्ये दिला आहे.)

**याशिवाय आपापल्या परीक्षेमध्ये मराठे परिवारात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या खालील विद्यार्थ्यांना कै.कु.अनिता खांबेटे स्मृति योजने** अंतर्गत विशेष पारितोषिके देण्यात आली.

१)कु.ऋता संजय करमरकर (पृ.५२०) बदलापूर -दहावी;

२)कु.गौरव संजय मराठे (पृ.४१६) अमरावती -बारावी;

३)कु.प्राची हेमंत मराठे (पृ.२१) नालासोपारा-इ.चौथी शिष्यवृत्ती; व

४)कु.प्रगत प्रद्युम्न (प्रदीप) मराठे (पृ. ३४२)गोरेगांव रायगड -इ. सातवी शिष्यवृत्ती याना प्रत्येकी रु.२५०(एकूण रु.१०००) देण्यात आले.

तसेच गणेश तांत्रिक शिक्षण पारितोषिक योजनेअंतर्गत खालील विद्यार्थ्यास दहावीच्या परीक्षेत मराठे परिवारात तांत्रिक विषय घेऊन सर्वाधिक गुण मिळवून उत्तीर्ण झाल्याबद्दल पारितोषिक देण्यात आले.

५) कु.श्रेयस शरच्चंद्र मराठे (पृ. ३७०) ठाणे -दहावी रु. ५००

आमच्याकडे येणाऱ्या पारितोषिकांसाठींच्या अर्जांची संख्या पारितोषिकासाठी पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मानाने खूपच कमी आहे असे वाटते. याकरिता दिलेल्या मुदतीत न चुकता अर्ज पाठवून गुणवान विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारण्याचे श्रेय प्रतिष्ठानला मिळवून देण्यासाठी आपल्या सहकार्याची अपेक्षा आहे.

### शैक्षणिक मदत

शिक्षणाविषयी प्रतिष्ठान वरीलप्रमाणे पारितोषिके व गरजूंना शैक्षणिक मदत देत असते. आपल्या परिवारातील तरुणाना शिक्षण पुरे करण्याकरिता आर्थिक मदतीची जरूरी भासत असेल तर विनासंकोच त्यांनी प्रतिष्ठानकडे आपली अडचण सांगावी. आम्हाला शक्य होईल ती मदत करूच; पण इतर मार्गानी मार्गदर्शन सुद्धा करू.

### शिक्षण निधी

अहवाल साली या निधीमध्ये देणग्या रु.२,९५२ व व्याज रु. २३,४१६ ची भर पडली. गुणवत्ता पारितोषिकांसाठी रु. ८,४५० वजा जाता वर्षअखेर रु.३,३०,१३० शिल्लक आहेत.(गतवर्षी ३,१२,२१०). शिक्षणनिधीला अधिक प्रतिसादाची अपेक्षा आहे.

### कै. विनय खांबेटे स्मृति योजना

या योजनेतून इंजिनियरिंगच्या उच्च शिक्षणासाठी बिनव्याजी कर्ज दिले जाते. दोन विद्यार्थ्याना दिलेल्या रु.२०,००० च्या कर्जानंतर या योजनेअंतर्गत अहवालवर्षअखेर रु. ३०,२७७ उपलब्ध आहेत (गतवर्षी रु.२८,१६५). त्यामुळे नवीन कर्जाऊ शिष्यवृत्तीचा विचार करता येईल.

### हितगुज

कागदाचे,मुद्रणाचे व टपालाचे दर वेगाने वाढत असताना जाहिरातीच्या आधाराशिवाय हितगुज आपणापर्यंत पोहोचविणे कठीण होऊ लागल्याचे वेळोवेळी आम्ही आपल्यापुढे मांडत आलो आहोत. काटकसरीचा उपाय म्हणून वार्षिक अहवाल व त्या तिमाहीचा हितगुज अंक एकत्रित पाठविण्याचा प्रयोग गतवर्षापासून सुरू केला आहे. त्यानुसार हा एकत्रित जोड अंक आहे. मात्र हितगुजनिधीला देणग्या देऊन व हितगुज अंकामध्ये आपल्या व्यावसायिक तसेच वैयक्तिक जाहिराती देऊन किंवा अन्य मार्गाने प्रतिष्ठानला मदत करावी ही पुनश्च एकवार विनंती. हितगुज अंक ६०-डिसेंबर २००४ पासून विभागवार हितगुज तहहयात वर्गणीदारांचे पत्ते द्यावयास सुरुवात केली आहे. आतापर्यंत खालील विभाग पूर्ण केले आहेत.

१)अंक ६०(डिसेंबर २००४): गोवा ; गुजरात ; मध्य प्रदेश; बिहार; पश्चिम बंगाल ; कर्नाटक; आंध्र प्रदेश; व उत्तर प्रदेश

२)अंक ६१ (मार्च २००५): महाराष्ट्र ( जिल्हे-रायगड ,रत्नागिरी सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सोलापूर, सातारा, व अहमदनगर)

३)सोबतचा एकत्रित अंक ६३(सप्टेंबर २००५): महाराष्ट्र (ठाणे, पुणे व मंबई व्यतिरिक्त उर्वरित जिल्हे)

या पुढील काही अंकांमध्ये अनुक्रमे ठाणे, पुणे व मंबई येथील पत्ते छापण्याचा विचार आहे. प्रत्येक वेगळ्या राहाणाऱ्या स्वतंत्र कुटुंब घटकाचा प्रतिष्ठानशी थेट संबंध स्थापित होण्याच्या दृष्टीने अशा सदस्यानी सुद्धा हितगुजचे तहहयात वर्गणीदार होणे आवश्यक आहे. व यासाठी आजीव सदस्यता शुल्क रु.१०० व हितगुज तहहयात वर्गणी केवळ रु.२००मिळून एकूण फक्त रु.३०० प्रतिष्ठानकडे पाठविल्यास त्यांना वरील तीनही अंक उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करता येईल. या संधीचा लाभ परिवारातील माहेरवाशिणींनी सुद्धा घ्यावा व हे सर्व अंक जपून ठेवून आपापली **मराठे डिरेक्टरी** संग्रही ठेवावी अशी अपेक्षा आहे.

तसेच सदस्यांनी आपापल्या बांधवांचे पत्ते तपासून पहावेत व त्यातील सुधारणा (दूरध्वनि क्रमांकासह) आम्हाला कळवाव्यात. या यादीमध्ये समाविष्ट नसलेल्या मराठे परिवारीय व्यक्तींना प्रतिष्ठानचे सदस्य व हितगुजचे वर्गणीदार होण्यासाठी प्रयत्न करावेत व त्यांचे पत्ते आम्हाला कळवावेत.

### हितगुजनिधी

अहवाल साली या निधीमध्ये देणग्या रु. २७२; तहहयात वर्गणी रु.७,३००; व्याज रु. २०,४६२; व जाहिराती रु.९१०३; मिळून रु. ३७,१३७ ची वाढ झाली व निव्वळ हितगुज प्रकाशनखर्च रु.२०,०२७ वजा जाता रु.२८०,८३३.३५ वर्षअखेर शिल्लक आहेत.(गतवर्षी रु. २,७२,८२६.३५)

### वैद्यकीय मदत निधी

या निधीमध्ये देणग्या रु.१९,५०१ व व्याज रु.१,९५६ मिळून रु.२१,४५७ ची वाढ होऊन मदतीपोटी दिलेले रु. १०,००० वजा जाता वर्षअखेर रु. ३७,५४० शिल्लक आहेत. (गतवर्षी २६,०८३). वैद्यकीय मदतीसंदर्भात प्रतिष्ठानकडे आलेल्या अर्जांचा सहानुभूतीपूर्वक विचार केला जातो. ज्या सभासदाना शक्य असेल त्यानी वैद्यकीय मदतनिधीमध्ये भर घालावी.

### उद्योग प्रेरणाः

हा उपक्रम अजूनही जोर पकडत नाही. सभासदानी, विशेषतः तरुणवर्गाने प्रतिष्ठानला त्यांच्या सूचना वा अपेक्षा जरूर कळवाव्या.

### उद्योग प्रवर्तन निधी

या निधीमध्ये व्याज रु.२,८३८ ची भर पडून अहवालवर्ष अखेर रु.४०,६७८ शिल्लक आहेत (गतवर्षी रु. ३७,८४०).

### कुलवृत्तांत निधी

या निधीमध्ये व्याज रु.४६१ ची भर पडून अहवालसाल अखेर रु.६,६०६ शिल्लक आहेत (गतवर्षी रु. ६,१४५) .आपला कुलवृत्तांत अद्ययावत करण्याचा आमचा प्रयत्न आहे. आपल्या कुटुंबातील फेरबदल आपण वेळोवेळी कळवावेत . म्हणजे तशी नोंद घेता येईल. कुलवृत्तांताची दुसरी आवृत्ती उपलब्ध नाही. पण मागणीप्रमाणे झेरॉक्स प्रत देण्याची योजना आहे .तपशील या जोड-अंकामध्ये अन्यत्र पहावा.

### कै. सुरेशभाऊ स्मृतिनिधीः

अहवालसाली या निधीमध्ये देणग्या रु. ५,५०० व व्याज रु.४,६७२ मिळून रु.१०,१७२ ची वाढ झाली. काही कारणाने खंडित झालेला **कै. सुरेशभाऊ स्मृति सांस्कृतिक कार्यक्रम** यावर्षी ठाणे येथे दिमाखात साजरा झाला. त्याचा वृत्तांत हितगुज-मार्च २००५ मध्ये पहावा. त्यानिमित्त झालेल्या रु. ६,९५० च्या खर्चानंतर वर्षअखेर रु.६५,५११ शिल्लक आहेत. (गतवर्षी रु.६२,२८९)

### कायम निधी :

अहवालसाली वाढ रु.३,२०० मिळून वर्षअखेर शिल्लक रु.१,६५,५९५ (गतवर्षी रु. १,६२,३९५)

### विशिष्ठ हेतु निधीः

अहवालसाली व्याज रु.८,१२६ रु मिळून वर्षअखेर शिल्लक रु.१,१६,४७५.७५ (गतवर्षी रु. १,०८,३४९.७५). या निधीचा विनियोग कॅन्सर सारख्या दुर्धरव्याधिग्रस्त गरजू व्यक्तींसाठी करता येतो.

### युवामंच निधीः

अहवालसाली व्याज रु. ७५ मिळून वर्षअखेर शिल्लक रु.१,०७६ (गतवर्षी रु.१,००१).

### अनिता खांबेटे स्मृति पारितोषिक योजनाः

श्री. सीताराम गोपाळ खांबेटे (पृ. ६७६) यांनी प्रायोजित केलेल्या या योजनेतून प्रतिवर्षी दहावी, बारावी, प्राथमिक शिष्यवृत्ती ( इ. चौथी) व माध्यमिक शिष्यवृत्ती (इ.सातवी) या परिक्षेत मराठे परिवारात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यास प्रत्येकी रु. २५०चे पारितोषिक दिले जाते. अहवालसाली व्याज रु.९६६ मिळून व पारितोषिके रु.१,००० वजा जाता वर्षअखेर शिल्लक रु.१२,८४३.(गतवर्षी रु.१२,८७७)

### गणेश तांत्रिक शिक्षण पारितोषिक योजनाः

या योजनेतून तांत्रिक विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले जाते. ही योजना अधिक व्यापक करण्याच्या हेतूने प्रायोजक श्री. प्रभाकर गणेश मराठे यांनी उत्स्फूर्तपणे रु. १०,००० ची भरघोस वाढीव देणगी दिली. पात्रतेचे निकष हितगुज - जून २००५ मध्ये पहा. या योजनेमध्ये अहवालसाली व्याज रु.५८१ व वाढीव देणगी रु. १०,००० मिळून १०,५८१ ची वाढ झाली. पारितोषिकासाठीचे रु.५०० वजा जाता वर्षअखेर शिल्लक रु.१७,८३२ (गतवर्षी रु.७,७५१).

### हिंदी पारितोषिक योजनाः

सौ. सुलभा अनंत (पृ.३२६) प्रायोजित या योजनेतून दहावीच्या परीक्षेत हिंदी विषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक दिले जाते. अहवालवर्षी व्याज रु.८७ मिळून वर्षअखेर शिल्लक रु.१,२४३ (गतवर्षी रु.१,१६६).

### वैदिक शिक्षण योजनाः

श्रीमती शालिनी धुंडिराज(पृ. १३४) प्रायोजित वैदिक शिक्षण योजनेअंतर्गत वैदिक शिक्षण किंवा हिंदुधर्म प्रचारासाठी वार्षिक रु. १,००० पर्यंत रोख पुरस्कार दिला जातो. या योजनेमध्ये अहवालवर्षी व्याज रु.१,१८२ मिळून व रु.३००० ची मदत वजा जाता वर्षअखेर शिल्लक रु.१३,९३७ (गतवर्षी रु.१५,७५५)

### शौर्य पारितोषिक योजनाः

अहवालसाली व्याज रु.१६४ मिळून वर्ष अखेर शिल्लक रु.२३४५ (गतवर्षी रु.२,९८१)

### शाखा कार्य- पुणे शाखाः

पुणे शाखेचे काम अत्यंत समाधानकारक रितीने चालू आहे. पुणे शाखेने वधुवर शाखा कार्य उत्तमपणे चालविले आहे. हितगुजच्या प्रत्येक अंकामध्ये वधुवर सहाय्य या सदरात विवाहयोग्य वधुवरांची माहिती देण्यात येते.

यारवेरीज सांगली, मिरज, नागपूर, गोवा व पुणे येथील बांधव छोटे छोटे मेळावे घेऊन विचार-विनीमय करतात, लहान सहान कार्यक्रम करतात. अन्यत्रसुद्धा असे कार्यक्रम,असे मेळावे भरले पाहिजेत. सदस्यांचे पत्ते हितगुजमध्ये प्रसिद्ध करीत असल्यामुळे हे काम अधिक सुकर होऊ शकेल. बेळगांव, बंगलोर, बडोदे,अहमदाबाद, भोपाळ,ग्वाल्हेर, इंदूर, हैद्राबाद, यासारख्या परप्रांतीय शहरातील कुलबंधूनी सुद्धा असा प्रयत्न करावा. आम्हाला पूर्वसूचना देऊन कळविल्यास प्रतिष्ठानचे प्रतिनिधी मार्गदर्शन करण्यास उत्सुक आहेत. अहवालानिमित प्रतिष्ठानचे कार्यकारीमंडळ मराठे परिवारातील समस्त बंधू भागिनीना अत्यंत कळकळीचे आवाहन करीत आहे की आपण विचाराने व शक्य तेथे प्रत्यक्षपणे एकत्र येऊन एकमेका साह्य करण्याचे व्रत स्वीकारावे.

**श्रद्धांजली**

अहवालसाली ज्या व्यक्तींचे दुःखद निधन झाले त्यांची नावे हितगुजच्या अंकामधून वेळोवेळी प्रसिद्ध केली जातात. या सर्व ज्ञात व अज्ञात मृत व्यक्तींच्या परिवार-सदस्यांचे दुःखामध्ये प्रतिष्ठान सहभागी आहे.

**ऋणनिर्देश**

प्रतिष्ठानच्या कार्यात ज्या सभासदानी व त्यांच्या कुटुंबियांनी वेळात वेळ काढून सर्व कामे बाजूला सारून, प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष हातभार लावला त्यां सर्वांचे कार्यकारी मंडळ अत्यंत ऋणी आहे.

आनंद यशवंत मराठे

अध्यक्ष

परिशिष्ट अ

## मराठे प्रतिष्ठान

मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग

प्रभादेवी, मुंबई ४०००२५

### आजीव सभासद व हितगुज-तहहयात वर्गणीदार होण्यासाठी करावयाचा अर्ज (नमुना)

मराठे प्रतिष्ठानची घटना व नियम यानुसार मी मराठे प्रतिष्ठान चा आजीव सभासद व प्रतिष्ठानचे मुखपत्र हितगुज याचा तहहयात वर्गणीदार होऊ इच्छितो.

वर्गणी :रु.१०० व हितगुजसाठी रु.२०० (एकूण रु. ३००) रोख / मनीऑर्डरने / (मुंबईतील बँकेवर काढलेल्या) डिमांड ड्राफ्ट किंवा चेकने सोबत पाठवीत आहे.ड्राफ्ट/चेक नं................दि.........

बँकेचे नांव व शाखाः.... ...............................................

दिनांकः सहीः..................................

संपूर्ण नांवः ...................................................

जन्मतारीखः...................टेलिफोन नं. ........................

संपूर्ण पत्ताः ..................................................

..............................................................

................................ पिनकोड ...............

व्यवसाय / नोकरी (पूर्ण तपशीलासह)................................

..............................................................

टेलिफोन नं.................. ई-मेल ...............................

परिशिष्ट ब

**वर्ष २००४-२००५ मध्ये नवीन आजीव सदस्य, हितगुज तहहयात वर्गणीदार व आश्रयदाता सदस्यांकडून प्राप्त रकमाः**

| पावती क्र. | आडनाव | नाव | कुवृपृ | वास्तव्य | रक्कम | आ.स.शु. | हि.त.व. | आश्रय. | आ.स.क्र. | हि.व.क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | आ.स. व हितगुज तहहयात वर्गणी | | | | | | | | | |
| मुं १५२२ | मराठे | सुमेधा प्रभाकर | १२० | वडाळा | १०० | १०० | | | ३३१२ | |
| मुं १५२८ | मराठे | गजानन रंगनाथ | ५८१ | बंगलोर | १०० | १०० | | | ३३१३ | |
| मुं १५३३ | विद्वांस | शुभदा अविनाश | ६४८ | विरार | १०० | १०० | | | ३३१७ | |
| मुं १५४३ | मराठे | राजेंद्र व्यंकटेश | २७६ | डोंबिवली | १०० | १०० | | | ३३२३ | |
| पु ०९७९ | गोखले | आरती दिलीप | ? | पुणे | १०० | १०० | | | ३३३२ | |
| मुं १५३० | मराठे | दीपक नारायण | २७२ | विलेपार्ले | ३०० | १०० | २०० | | ३३१४ | ९९१ |
| मुं १५३१ | पेठे | निशा नरहर | ७२८ | विलेपार्ले | ३०० | १०० | २०० | | १५३१ | ९९२ |
| मुं १५३२ | विद्वांस | अविनाश दिवाकर | ६४८ | विरार | ३०० | १०० | २०० | | ३३१६ | ९९३ |
| मुं १५३४ | मराठे | उपेंद्र दिगंबर | २७४ | पनवेल | ३०० | १०० | २०० | | ३३१८ | ९९४ |
| मुं १५३५ | मराठे | उमेश दिगंबर | २७४ | ठाणे | ३०० | १०० | २०० | | ३३१९ | ९९५ |
| मुं १५३६ | मराठे | अरूण श्रीकृष्ण | ९५ | भोपाळ | ३०० | १०० | २०० | | ३३२० | ९९६ |
| मुं १५३७ | मराठे | विजय श्रीकृष्ण | ९५ | भोपाळ | ३०० | १०० | २०० | | ३३२१ | ९९७ |
| मुं १५४८ | मराठे | विनायक प्रभाकर | २९२ | बोरिवली | ३०० | १०० | २०० | | ३३२४ | १००० |
| मुं १५४९ | मराठे | मंगेश प्रभाकर | २९२ | अंधेरी | ३०० | १०० | २०० | | ३३२५ | १००१ |
| मुं १५९२ | मराठे | मनाली प्रसाद | ३४२ | गोरेगांव-रा. | ३०० | १०० | २०० | | ३३३३ | १००६ |
| पु ०९६४ | मराठे | उदय गणेश | २७४ | पुणे | ३०० | १०० | २०० | | ३३२६ | १००२ |
| पु ०९७० | मराठे | मधुसूदन यशवंत | ५११ | पुणे | ३०० | १०० | २०० | | ३३२७ | १००४ |
| पु ०९७३ | मराठे | अविनाश दत्तात्रय | ३७१ | पुणे | ३०० | १०० | २०० | | ३३२८ | १००५ |
| पु ०९८३ | भिडे | विजया मिलिंद | ५१५ | पुणे | ३०० | १०० | २०० | | ३३३० | १००९ |
| पु ०९८५ | मराठे | विश्वास यशवंत | २३२ | पुणे | ३०० | १०० | २०० | | ३३३१ | १०१० |
| पु ०९८२ | मराठे | विजय भालचंद्र | ३९० | पुणे | ३०० | १०० | २०० | | ३३२९ | १००८ |
| मुं १५२५ | मराठे | सदाशिव वामन | ५४८ | गोवा | १०० | १०० | | | ३३२२ | |
| मुं १५३९ | मराठे | रावींद्र दिनकर | ३२ | विरार | २०० | | २०० | | ३२७९ | ९९९ |
| पु ०९६८ | विद्वांस | अलका दिवाकर | ६२९ | पुणे | २०० | | २०० | | | १००३ |
| पु ०९७८ | मराठे | माधव दिनकर | ८७ | पुणे | २०० | | २०० | | | १००७ |
| मुं १५३८ | खरे | स्मृति रोहित | ६२३ | अमेरिका | ४,५०० | | ३,५०० | १,००० | १२१८ | ९९८ |
| | | | | | १०,५०० | २,२०० | ७,३०० | १,००० | | |

# मराठी प्रतिष्ठान ताळेबंद ३१-३-२००५

| ३१-०३-०४ | निधी व देणी | | ३१-०३-०५ |
|---|---|---|---|
| १,५६,५९५.०० | *कायम निधी* | १,६२,३९५.०० | |
| ३,३००.०० | अधिक :आ.स.शुल्क (मुं.) | १,५००.०० | |
| १,५००.०० | अधिक :आ.स.शुल्क (पु.) | ७००.०० | |
| १,०००.०० | अधिक:आश्रय. शु. (मुं.) | १,०००.०० | १,६५,५९५.०० |
| ४,७१९.०० | *कुलवृत्तांत निधी* | ६,१४५.०० | |
| १,००१.०० | अधिक : देणग्या (मुं.) | ०.०० | |
| ४२५.०० | अधिक : व्याज | ४६१.०० | ६,६०६.०० |
| २,८५,९२०.०० | *शिक्षण निधी* | ३,१२,२१०.०० | |
| ३,७५४.०० | अधिक : देणग्या (मुं.) | १,२५२.०० | |
| ६,१०३.०० | अधिक : देणग्या( पु.) | १,७०२.०० | |
| २५,७३३.०० | अधिक : व्याज | २३,४१६.०० | |
| -९,३००.०० | वजा:उत्पन्न व खर्चाकडे वर्ग | -८,४५०.०० | ३,३०,१३०.०० |
| ५७,१४६.०० | *सुरेशभाऊ स्मृति निधी* | ६२,२८९.०० | |
| ०.०० | अधिक : देणग्या (मुं.) | ५,५००.०० | |
| ५,१४३.०० | अधिक : व्याज | ४,६७२.०० | |
| | वजा:उत्पन्न व खर्चाकडे वर्ग | -६,९५०.०० | ६५,५११.०० |
| ३३,७९८.०० | *उद्योग प्रवर्तन निधी* | ३७,८४०.०० | |
| १,०००.०० | अधिक : देणग्या (मुं.) | ०.०० | |
| ३,०४२.०० | अधिक : व्याज | २,८३८.०० | ४०,६७८.०० |
| ९९,४०३.७५ | *विशिष्ट हेतु निधी* | १,०८,३४९.७५ | |
| ८,९४६.०० | अधिक : व्याज | ८,१२६.०० | १,१६,४७५.७५ |
| २०,७१७.०० | *वैद्यकीय मदत निधी* | २६,०८३.०० | |
| ४,०००.०० | अधिक : देणग्या (मुं.) | १९,५०१.०० | |
| ४,५०१.०० | अधिक : देणग्या( पु.) | ०.०० | |
| १,८६५.०० | अधिक : व्याज | १,९५६.०० | |
| -५,०००.०० | वजा:उत्पन्न व खर्चाकडे वर्ग | -१०,०००.०० | ३७,५४०.०० |
| १,००१.०० | *युवा मंच निधी* | १,००१.०० | |
| ०.०० | अधिक : व्याज | ७५.०० | १,०७६.०० |
| २,६४,७४६.९० | *हितगुज निधी* | २,७२,८२६.३५ | |
| २,३७७.०० | अधिक : देणग्या (मुं.) | २७२.०० | |
| २,००१.०० | अधिक : देणग्या( पु.) | ०.०० | |
| ७,२००.०० | अधिक : तह. वर्गणी (मुं.) | ५,७००.०० | |
| ३,६००.०० | अधिक : तहह. वर्गणी (पु.) | १,६००.०० | |
| २३,८२७.०० | अधिक : व्याज | २०,४६२.०० | |
| -३०,९२५.५५ | वजा:उत्पन्न व खर्चाकडेवर्ग | -२०,०२७.०० | २,८०,८३३.३५ |
| ४५,८३९.०० | *विनय खांबेटे स्मृ.यो.* | ४८,१६५.०० | |
| २,३२६.०० | अधिक : व्याज | २,११२.०० | ५०,२७७.०० |
| १२,७३१.०० | *अनिता खांबेटे स्मृ.यो.* | १२,८७७.०० | |
| १,१४६.०० | अधिक : व्याज | ९६६.०० | |
| -१,०००.०० | वजा:उत्पन्न व खर्चाकडे वर्ग | -१,०००.०० | १२,८४३.०० |
| ७,१११.०० | *गणेश तां.शि.पा.यो.* | ७,७५१.०० | |
| ६४०.०० | अधिक : व्याज | ५८१.०० | |
| | अधिक : देणग्या (मुं.) | १०,०००.०० | |
| | वजा:उत्पन्न व खर्चाकडे वर्ग | -५००.०० | १७,८३२.०० |
| १,०७०.०० | *हिंदी पारितो.योजना* | १,१६६.०० | |
| ९६.०० | अधिक : व्याज | ८७.०० | १,२५३.०० |
| १०५९,०९८.१० | एकूण | ११,२६,६५०.१० | ११,२६,६५०.१० |

| ३१-०३-०४ | मालमत्ता व येणी | | ३१-०३-०५ |
|---|---|---|---|
| | गुंतवणूक | | |
| | मुदत ठेवी | | |
| ३,२५,२९३.०० | सारस्वत बँक,वरळी | ३,२५,२९३.०० | |
| १,६५,०००.०० | कॉसमॉस बँक,दादर | १,६५,०००.०० | |
| १,८२,५४२.०० | जनता बँक(पुणे)दादर | १;८२,५४२.०० | |
| २,२४,३२७.८० | जनकल्याण बँक,शीव | २,२४,३२७.८० | |
| ७५,०००.०० | जनकल्याण बँक,दादर | ७५,०००.०० | |
| १,१०,०००.०० | जनकल्याण बँक,शिपा. | १,१०,०००.०० | |
| ५९,०००.०० | यु.टी.आय. | ५९,०००.०० | |
| ३५,१७४.०० | युकोबँक,पुणे | ३५,१७४.०० | ११,७६,३३६.८० |
| | येणे व्याज | | |
| ७,९११.२५ | जनकल्याण बँक,शीव | १९,०६५.०० | |
| १,२३०.०० | युकोबँक,पुणे | ३,४८४.०० | २२,५४९.०० |
| | आयकर (टीडीएस) | | |
| २,२६२.०० | १९९८-९९ | २,२६२.०० | |
| ४,९६८.०० | १९९९-०० | ४,९६८.०० | |
| २,९८८.०० | २०००-०१ | २,९८८.०० | |
| २,२९६.०० | २००१-०२ | २,२९६.०० | |
| २,००२.०० | २००२-०३ | २,००२.०० | |
| ६९६.०० | २००३-०४ | ६९६.०० | १४,४१२.०० |
| | वैद्यकीय मदत कर्ज | | |
| ०.०० | श्री. के. मराठे-वेंगुर्ले | २०,०००.०० | २०,०००.०० |
| | बँकेतील शिल्लक व रोख | | |
| | बँक | | |
| ११,७७७.२५ | सारस्वत बँक, वरळी | ६४,२९८.७० | |
| २५,६६६.०० | युकोबँक , पुणे | १९,५५८.०० | ८३,८५६.७० |
| | रोख | | |
| २८२.०० | रोख (मुं.) | ४३२.०० | |
| १,९५५.२५ | रोख (पु.) | २,५२७.७५ | २,९५९.७५ |
| | कर्जाऊ शिष्यवृत्ती (वि.खां.स्मृ.यो.तून) | | |
| १०,०००.०० | तेजस शिरीष मराठे | १०,०००.०० | |
| १०,०००.०० | रविंद्र रामचंद्र खांबेटे | १०,०००.०० | २०,०००.०० |
| १२६७,५७०.५५ | एकूण | १३,४०,११४.२५ | १३,४०,११४.२५ |

| ३१-०३-०४ | निधी व देणी | | ३१-०३-०५ | ३१-०३-०४ | मालमत्ता व येणी | | ३१-०३-०५ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १,०५९,०९८.१० | | ११,२६,६५०.१० | ११,२६,६५०.१० | १२,६७,५७०.५५ | एकूण | १३,४०,११४.२५ | १३,४०,११४.२५ |
| १४,४५४.०० | ***वैदिक शिक्षण योजना*** | १५,७५५.०० | | | | | |
| १,३०१.०० | अधिक : व्याज | १,१८२.०० | | | | | |
| ०.०० | वजाःउत्पन्न वखर्चाकडे वर्ग | -३,०००.०० | १३,९३७.०० | | | | |
| २,००१.०० | ***शौर्य पारितो.योजना*** | २,१८१.०० | | | | | |
| १८०.०० | अधिक : व्याज | १६४.०० | २,३४५.०० | | | | |
| | ***तरतुदी*** | | | | | | |
| ८१०.०० | लेखा परीक्षण फी | ७५०.०० | | | | | |
| ५,०८२.०० | धर्मादाय आयुक्त फी | ५,४३०.०० | ६,१८०.०० | | | | |
| | ***उत्पन्न व खर्च*** | | | | | | |
| १९२,५१७.०३ | गतवर्ष ताळेबंदानुसार | १,८४,६४४.४५ | | | | | |
| ०.०० | अधिकःखर्चापेक्षा जमा जास्त | ६,३५७.७० | | | | | |
| -७,८७२.५८ | वजाःजमेपेक्षा खर्च जास्त | - ०.०० | १,९१,००२.१५ | | | | |
| १२६७,५७०.५५ | एकूण | १३,४०,११४.२५ | १३,४०,११४.२५ | १२,६७,५७०.५५ | एकूण | १३,४०,११४.२५ | १३,४०,११४.२५ |

चार्टर्ड अकाउंटंट्स
चंद्रकांत वामन मराठे
मुंबई १-०७-०५ सनदी लेखापाल

कृते मराठे प्रतिष्ठान
आनंद य.मराठे प्रभाकर दा. मराठे मोहन स. मराठे
अध्यक्ष कोषाध्यक्ष कार्यवाह

## मराठे प्रतिष्ठान आयव्यय पत्रक वर्ष ३१-३-०५अखेर

| ३१-०३-०४ | व्यय (खर्च) | | ३१-०३-०५ | ३१-०३-०४ | आय (जमा) | | ३१-०३-०५ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ८१०.०० | लेखा परीक्षण फी | ७५०.०० | | | जमा व्याज | | |
| २,६५७.०० | धर्मादाय आयुक्त फी | ३४८.०० | १,०९८.०० | | *अ)मुदत ठेवींवरील व्याज* | | |
| | प्रतिष्ठान हेतुपूर्तीसाठी खर्च | | | | (विविध निधी /योजनांचा | | |
| | मुंबई(मुख्य कार्यालय) खर्च | | | २७,८०८.१७ | हिस्सा वर्ग करून) | २७,३७८.२० | २७,३७८.२० |
| ७,२४०.०० | वार्षिकसभा खर्च | ३,०५५.०० | | | *ब)बचत खात्यांवरील व्याज* | | |
| २०.०० | बँक चार्जेस (मुं.) | १२३.०० | | १,८८१.०० | सारस्वत बँक, वरळी | १,५५६.०० | |
| ०.०० | का.का.सभाप्रवासभत्ता(पु.) | २,५००.०० | | १३०.०० | युकोबँक , पुणे | ७९२.०० | २,३४८.०० |
| ६४०.०० | किरकोळ खर्च (मुं.) | ०.०० | | | विविध निधींतून वर्ग | | |
| ४,७०२.०० | छपाई व स्टेशनरी (मुं.) | ५,८०३.०० | | १,०००.०० | अनिता खांबेटेस्मृतियोजना | १,०००.०० | |
| ५,५५८.०० | टपाल व वितरण (मुं.) | ९६०.०० | | ९,३००.०० | शिक्षण निधी | ८,४५०.०० | |
| ०.०० | वेबसाइट खर्च | ५,७५०.०० | | ०.०० | गणेश तां.शि.पा.यो. | ५००.०० | |
| १,०००.०० | अनिता खांबेटे स्मृ.पारि. | १,०००.०० | | ०.०० | वैदिक शिक्षण योजना | ३,०००.०० | |
| ९,३००.०० | गुणवत्ता पारितोषिके | ८,४५०.०० | | ०.०० | सुरेशभाऊ स्मृति योजना | ६,९५०.०० | |
| | गणेश तां.शि.पारितोषिक | ५००.०० | | ५,०००.०० | वैद्यकीय मदत निधी | १०,०००.०० | २९,९००.०० |
| ०.०० | वैदिक शिक्षण पारितोषिक | ३,०००.०० | | | वार्षिक सभाखर्चासाठी देणग्या | | |
| ०.०० | सुरेशभाऊ स्मृ.सां.कार्य.खर्च | ६,९५०.०० | | २,०००.०० | सी. गो. खांबेटे | ०.०० | |
| ५,०००.०० | वैद्यकीय मदत | १०,०००.०० | ४८,०९९.०० | २,०००.०० | वा.ग. मराठे | ०.०० | ०.०० |
| | पुणे शाखा खर्च | | | | पुणे शाखा जमा | | |
| ०.०० | वर्धापन दिन खर्च (पु.) | ५,२७२.५० | | ०.०० | वर्धापनदिनखर्च देणग्या | १,२५२.०० | |
| ०.०० | छपाई व स्टेशनरी (पु.) | ५२.०० | | १७०.०० | किरकोळ जमा- वधुवर (पु.) | १५०.०० | |
| ४१५.०० | बँक चार्जेस (पु.) | ०.०० | | ०.०० | किरकोळ जमा- वधुवर (मुं.) | १००.०० | १,५०२.०० |
| ३६०.०० | टपाल व वितरण (पु.) | २५७.०० | | | | | |
| ११,४५९.७५ | पुणे संमेलन २००३ तूट | ०.०० | ५,५८१.५० | | | | |
| | हितगुज प्रकाशन खर्च | | | | हितगुज प्रकाशन जमा | | |
| १९,४७०.०० | हितगुज छपाई (मुं.) | १५,६००.०० | | १,५००.०० | हितगुज जाहिराती | ९,१०३.०० | |
| ११,३६६.०५ | हितगुज पोस्टेज (मुं.) | १२,२४७.०० | | ३०,९२५.५५ | हितगुज निधीतून वर्ग | २०,०२७.०० | २९,१३०.०० |
| ०.०० | हितगुज पोस्टेज (पु.) | ४००.०० | | | | | |
| ८९४.५० | हितगुज टेलिफोन (मुं.) | २३६.०० | | | | | |
| ६९५.०० | हितगुज प्रवास (मुं) | ६४७.०० | २९,१३०.०० | | | | |
| ०.०० | खर्चापेक्षा ज्यादा उत्पन्न | ६,३५७.७० | ६,३५७.७० | ७,८७२.५८ | उत्पन्नापेक्षा ज्यादा खर्च | | ०.०० |
| ८९,५८७.३० | एकूण | ९०,२५८.२० | ९०,२५८.२० | ८९,५८७.३० | एकूण | ९०,२५८.२० | ९०,२५८.२० |

चार्टर्ड अकाउंटंट्स
चंद्रकांत वामन मराठे
मुंबई १-०७-०५ सनदी लेखापाल

कृते मराठे प्रतिष्ठान
आनंद य.मराठे प्रभाकर दा. मराठे मोहन स. मराठे
अध्यक्ष कोषाध्यक्ष कार्यवाह

## वर्ष २००४-२००५ मध्ये विविध निधी व हितगुज जाहिरातींसाठी सदस्यांकडून प्राप्त रकमा:

| पावतीक्र. | आडनाव | नाव | कुवृपृ | [illegible] | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| | **शिक्षण निधी** | | | | |
| मुं १५१५ | मराठे | चिंतामणि महादेव | २२२ | परळ | ५०१ |
| मुं १५२४ | मराठे | विश्वनाथ सीताराम | ५२० | गोवा | ७५१ |
| पु ०९६६ | जाईल | कमलाकर अनंत | ७५७ | पुणे | ५०१ |
| पु ०९६७ | मराठे | गजानन चिंतामण | १२९ | पुणे | १०१ |
| पु ०९६९ | मराठे | अनंत गोविंद | १२८ | पुणे | १,००० |
| पु ०९७१ | मराठे | गजानन चिंतामण | १२९ | पुणे | १०० |
| | | | | | २,९५४ |
| | **हितगुज जाहिरात** | | | | |
| मुं १५०४ | मराठे | प्रभाकर दामोदर | १२० | वडाळा | ६०० |
| मुं १५२० | मराठे | प्रभाकर दामोदर | १२० | वडाळा | ६०० |
| मुं १५२७ | मे. शारदा ज्युवेलर्स , | | | मुंबई | २,५०१ |
| मुं १५२९ | मराठे | प्रभाकर दामोदर | १२० | वडाळा | ६०० |
| मुं १५४१ | मे. वी. एम. ज्युवेलर्स | | | मुंबई | २,५०१ |
| मुं १५४४ | मे. सेंटेक्स इंडिया | | | मुंबई | १,२०० |
| मुं १५४७ | मराठे | प्रभाकर दामोदर | १२० | वडाळा | ६०० |
| मुं १५२६ | मराठे | शरद अरूण | २१ | नालासोपारा | ५०१ |
| | | | | | ९,१०३ |
| | **हितगुज निधी** | | | | |
| मुं १५०६ | जाईल | अनिल दत्तात्रय | ७५४ | घाटकोपर | २२१ |
| मुं १५२३ | मराठे | दत्तात्रय आत्माराम | ३२६ | मुलुंड | ५१ |
| | | | | | २७२ |
| | **वैद्यकीय मदत निधी** | | | | |
| मुं १५०१ | मराठे | हेमंत अरूण | २१ | नालासोपारा | १,००० |
| मुं १५०२ | मराठे | मोहन सदाशिव | ३६५ | खार | ५,००० |
| मुं १५०३ | मराठे | सुमन वामन | १७ | प्रभादेवी | ५,००० |
| मुं १५०७ | मराठे | विनायक केशव | २० | वरळी | १,००० |
| मुं १५१४ | मराठे | अरविंद दामोदर | २९२ | डोंबिवली | १,००० |
| मुं १५१६ | मराठे | प्रमोद कृष्ण | ३७६ | ठाणे | ५०१ |
| मुं १५१७ | मराठे | शरद अरूण | २१ | नालासोपारा | १,००० |
| मुं १५१९ | विद्वांस | रमाकांत माधव | ६२३ | माहिम | १,००० |
| मुं १५२१ | मराठे | सिताराम वासुदेव | २९७ | देवळाली | २,००० |
| मुं १५४० | मराठे | सिताराम वासुदेव | २९७ | देवळाली | २,००० |
| | | | | | १९,५०१ |
| | **गणेश तांत्रिक शिक्षण पारितोषिक योजना** | | | | |
| मुं १५०५ | मराठे | प्रभाकर गणेश | ६१ | दादर | १०,००० |
| | **सुरेशभाऊ स्मृति सांस्कृतिक कार्यक्रम निधी** | | | | |
| मुं १५८६ | मे. यशवंत विठ्ठल | | २७७ | ठाणे | ५,५०० |
| | **वर्धापन दिन देणग्या** | | | | |
| पु ०९६५ | मराठे | मुकुंद सीताराम | १८२ | पुणे | ५०० |
| पु ०९७५ | मराठे | यशवंत लक्ष्मण | १०१ | पुणे | ५०० |
| पु ०९७६ | मराठे | वसंत कृष्णाजी | ४१ | पुणे | १०१ |
| पु ०९७७ | मराठे | विष्णू रामचंद्र | ३०६ | पुणे | ५० |
| पु ०९८० | मराठे | शुभदा शंकर | ५१३ | पुणे | १०१ |
| | | | | | १,२५२ |

या २३व्या अहवाल २००४-२००५ ची पृष्ठे १ ते ८ (हितगुज, सप्टेंबर २००५ ची पृष्ठे ७ ते १४) यांची संगणकीय अक्षर जुळणी प्रतिष्ठानचे कार्यकारिणी सदस्य श्री. सी.गो.खांबेटे यांनी स्वतःपूर्ण करून प्रायोजित केली

# 'वानप्रस्थाश्रम' संस्थेत निःस्वार्थ कार्य करणाऱ्या कै. सौ. मंदाकिनी दामोदर

- **डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर** (पृ.१२०), वडाळा, मुंबई

*मराठे प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष चार्टर्ड अकाऊंटंट श्री. प्रभाकर दामोदर (पृ.१२०) यांच्या मातोश्री कै. सौ. मंदाकिनी दामोदर यांचा दि. २४ ऑगस्ट २००५ हा द्वितीय स्मृतिदिन. त्या निमित्ताने त्यांच्या सूनेने त्यांना लेखरूपाने वाहिलेली आदरांजली.*

माझ्या सासूबाईचा जन्म दि. २८ ऑगस्ट १९२९, गोकुळाष्टमीला, ठाणे येथे झाला. त्यांचे माहेरचे नाव कृष्णाबाई वामन जोशी. ठाण्याच्या एम्. एज्. हायस्कूलमधून १९४९ मध्ये त्या मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाल्या. त्यानंतर काही दिवस त्यांनी ठाण्याच्या जिल्हापरिषदेत नोकरी केली. त्यांचा विवाह दि. ४-२-१९५२ ला श्री. दामोदर हरि, (वडाळा) यांच्याबरोबर झाला. दि. १ फेब्रुवारी १९५३ ला त्यांच्या एकुलत्या एक मुलाचा प्रभाकरचा जन्म झाला.

विवाहानंतर त्यांनी एस.एन.डी.टी. म्हणजे श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठातून १९६२ साली बी.ए. (द्वितीय श्रेणी) पदवी संपादन केली. त्यानंतर राष्ट्रभाषा हिंदीच्या परीक्षा त्या उत्तीर्ण झाल्या. १९६६ मध्ये गिरगावातील शाळेतून त्यांनी नोकरी करायला प्रारंभ केला. नंतर १९६७ साली त्यांनी परळ येथील आर.एम. भट हायस्कूलमध्ये अध्यापनाची नोकरी स्वीकारली. या शाळेने त्यांना बी.एड. करण्यासाठी अनुमती दिली. त्यानुसार १९७३ मध्ये त्या एस.एन.डी.टी विद्यापीठातून प्रथम वर्गात बी.एड्. परीक्षा उत्तीर्ण झाल्या.

१९६७ ते १९८६ अशी एकोणीस वर्षे त्यांनी आर.एम. भट हायस्कूल, परळ येथे अध्यापनाचे काम उत्तमरीतीने केले. शाळेत मराठी, हिंदी या विषयांबरोबर संस्कृत आणि समाजसेवा हे विषयही त्या आत्मीयतेने शिकवीत. दादरच्या फाळके रोड येथील अंधशाळेत जाऊन त्यांनी अनेक वर्षे प्रत्यक्ष काम केले.

१९८७ नंतर शाळेतून निवृत्त झाल्यावर त्या स्वस्थ बसल्या नाहीत. पनवेल जवळील नेरे गावातील शांतीवनात पाच वर्षे राहून त्यांनी समाजसेवेचे काम प्रामाणिकपणे केले. या कामात त्यांना त्यांच्या पतीची, श्री. दामोदरपंतांची उत्तम साथ होती. सर्व प्रकारच्या कौटुंबिक जबाबदाऱ्याही त्यांनी पार पाडल्या.

**उत्तम व्यवस्थापक :**

१९९१ सालापासून माझ्या सासूबाई व मामंजी, डॉ. देसाई सहजीवन ट्रस्ट संचालित वानप्रस्थाश्रमात, लोणावळा येथे राहायला गेले. तेथे त्यांनी वानप्रस्थीयांचे जीवन जगून तेथे राहाणाऱ्या वृद्धांची सेवा करून एक वेगळाच आदर्श घालून दिला. वानप्रस्थाश्रमात एक उत्तम 'व्यवस्थापक' (Supervisor) म्हणून सासूबाईंनी चोख काम बजावले. डॉ. देसाई सहजीवन ट्रस्ट संचालित वानप्रस्थाश्रम उभा राहण्यात आणि तो उत्तमपणे ''सांभाळण्यात'' या मराठे दाम्पत्याचा सिंहाचा वाटा होता. विशेष म्हणजे वानप्रस्थाश्रमात पैसे देऊन त्या राहिल्या आणि व्यवस्थापनाचे काम कोणतेही 'मानधन' न घेता निस्पृहपणे त्यांनी केले ही अभिमानाची गोष्ट ठरते. 'वानप्रस्थाश्रमा'ला आपले 'घर' समजून आपुलकीने तेथे आनंदात बारा वर्षे म्हणजे एक तप राहिल्या.

या काळात आमच्या सासूबाई केवळ 'वानप्रस्थी' जीवन न जगता, त्यांनी अनेक समाजसेवी उपक्रमांत भाग घेतला. 'राष्ट्रसेविका समिती'च्या त्या पूर्ण वेळ कार्यकर्त्या होत्या. प. पू. पांडुरंगशास्त्री आठवले यांच्या 'स्वाध्याय' परिवाराचे काम त्या करीत. ज्येष्ठ नागरिक संघ, स्थानिक समिती, भगिनी मंडळ, ब्राह्मणसेवा संघ, योगासने वर्ग, हास्यमंडळ, शाळा, या सर्व संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता.

**दानशूरपणा :**

'दाता भवति वा न वा' असे म्हणतात, आमच्या सासूबाईंचा उल्लेखनीय गुण म्हणजे 'दातृत्व'. गाजावाजा न करता वेळोवेळी त्या आर्थिक साह्य करीत असत. भोसला मिलिटरी स्कूल, एम.एच. हायस्कूल, महाराष्ट्र विद्यालय (ठाणे), एस.एन.डी.टी विद्यापीठ, भारतीय स्त्रीजीवन विकास परिषद, राजमाता जिजाबाई ट्रस्ट, कमलाबाई मेहता अंधशाळा (दादर), माटुंगा येथील श्रद्धानंद महिलाश्रम, स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक (दादर), प. पू. घैसास गुरुजी यांची वेदपाठशाळा (पौंड), या आणि अशाच अन्य संस्थांना त्यांनी सुमारे दहा सहस्त्रापासून तो पंचवीस सहस्त्रापर्यंत सढळ हाताने भरघोस देणग्या दिल्या.

टापटीप, व्यवस्थितपणा, शिस्त, वेळेचे नियोजन हे त्यांचे गुण घेण्यासारखे होते. मटाराच्या करंज्या, उकडीचे मोदक, चकल्या, भाजणीचे वडे, अळूची भाजी, ओल्या नारळाच्या करंज्या हे पदार्थ त्या रूचकर करीत. आमच्या सासूबाई रसिक प्रेक्षक होत्या. नाटके पाहाण्याची त्यांना आवड होती. त्या स्वतःची पोलकी स्वतःच्या हाताने उत्तम शिवत. शिंप्यावर अवलंबून नाही.

आजारपणामुळे शेवटच्या काळात त्यांना दादर येथील डॉ. देसाई हॉस्पिटलमध्ये ३४ दिवस रहावे लागले. दि. २४-८-२००३ ला त्यांचे निधन झाले. या काळात डॉ. देऊळकर, डॉ. देसाई त्यांच्या पत्नी सौ. संगीताताई आणि कुंदाताई मराठे व हॉस्पिटलच्या सर्व कर्मचारीवर्गाने सासूबाईंची मनापासून सेवा केली. त्यांच्या मागे त्यांचे पती श्री. दामोदर, नातू चि. निरंजन, नात कुमारी मधुरा आहे. ती. कै. सौ. सासूबाईंना सौभाग्यपणी मरण आले. याहून भाग्य ते कोणते? त्या कृतार्थ, समाधानी जीवन जगल्या.

* * *

## अनोखी रोजगारसंधी

माझा मुलगा डॉ. चंद्रशेखर, फॉरेस्ट ऑफिसर हा हिमालय भ्रमंतीसाठी गेला आहे. यूथ होस्टेल तर्फे त्याला 'गाईड' म्हणून विशेष बोलावणे आले होते. ऋषिकेश पासून पुढे पायी जोशी मठ, बद्रीनाथ, गोविंद घाट, घांगरिया, व्हॅली ऑफ फ्लॉवर्स, हेमकुंड व परत ऋषिकेश असा १० दिवसांचा पायी प्रवास होणार आहे. भारत बघण्याची ही अपूर्व संधि तरुणांनी सोडू नये असे त्याचे मत आहे. तसेच तरुणांसाठी नवीन रोजगार संधि आहे असे मला वाटते.

- **चिंतामणि त्र्यंबक** (पृ.२४८),
कळवा, जि. ठाणे

# गोवा संमेलन - उपस्थित कुलबांधवांच्या आणखी काही प्रतिक्रिया

**तुळशीच्या पानाएवढे माहेर झाले भलामोठा वटवृक्ष**

मी गोवा संमेलनाला हजर राहिले आणि तेथील केवळ दोनच दिवसांचा अगदी आखीव व रेखीव व अतिशय शिस्तबद्ध कार्यक्रम पाहून इतकी भारावून गेले की, मी माझ्या माहेरीच गेले महिनाभर होते असे वाटले.

आजपर्यंत माझे माहेर म्हणजे, माझा एकुलता एक मोठा भाऊ (दामोदर हरि, पृ.१२०) वहिनी व माझ्या एकुलत्या एक भाच्याचे कुटुंब एवढेच एका तुळशीच्या पानाएवढे कुटुंब!! .....पण संमेलनाला आल्यामुळे माझे माहेर एवढेसे नसून 'आसेतु हिमाचल' पसरलेला भला मोठा वृक्ष आहे याची खात्री पटली व ऊर अभिमानाने भरून आला. संमेलनात आपली पदवी, आपली पत (समाजातली) व आपला पराक्रम हे सारे विसरून तेथे जो तो आपले घरचे कार्य असल्यासारखा मोठ्या हिरीरीने अगदी पडेल ते काम आनंदाने करीत होता. ही खरोखरच अभिमानाची गोष्ट आहे. अर्थात ह्यातील बरेचसे श्रेय बिंबल वासियांना हे नक्की!

औदार्य, आतिथ्य आणि अगत्य आदर हे गुण आम्हा शहरवासियांना दुर्मिळ! ते तिथल्या लहानशा खेड्यातील मंडळींना परमेश्वराने सढळ हाताने बहाल केलेत. बिंबल वासियांनी केलेले आम्हा सर्वांच्या औत्सुक्यपूर्वक स्वागताने खरंच मन भारावून गेले. तेथील दोन दिवसाचा कार्यक्रम. उद्घाटन, परस्पर परिचय, पर्यावरणाचे महत्त्व, व्याख्याने, गाणी, फुगड्या, दशावताराची झलक आणि नाखुषीने का होईने पण सर्वांकरिता निरोप समारंभ! हा मात्र होऊ नये असे वाटत होते. - **एक माहेरवाशीण - शकुंतला गोविंद नामजोशी (इंदुमती हरि मराठे, पृ.१२०)**

**परकेपणा बिलकुलच वाटला नाही**

गोवा संमेलन विशेषांक मिळाला. मी **श्रीमती निर्मला मराठे व माझा मुलगा प्रसन्न मराठ** असे दोघेही संमेलनाला पहिल्यांदाच उपस्थित होतो. थोडीशी बिंबलला पोचण्यास अव्यवस्था झाली होती. परंतु त्या रात्री आमची व्यवस्था थिवीचे श्री. मोरेश्वर हरी व सौ. वीणा मोरेश्वर ह्यांचे घरी झाल्याने आम्हास खूपच बरे वाटले. त्यानंतर दोन्हीही दिवस कार्यक्रम छान झाले व गोव्यातील मराठे मंडळींनी खूपच आदरातिथ्य केले व परकेपणा बिलकुलच वाटला नाही. - **श्रीमती निर्मला जनार्दन** (पृ.८२), भोपाळ

**चुकांची दुरुस्ती**

हितगुज जून २००५, गोवा अधिवेशन विशेषांकात खालील दुरुस्त्या करून घ्याव्या-

१. **पृ.४ स्वागतगीत कडवे २**
- सुरेशभाई ऐवजी सुरेशभाऊ
- कुलबांधवांते ऐवजी कुलबांधव ते

२. **कडवे ३** - पूर्वजां ऐवजी पूर्वजांचे

३. **पृ. १२**
क्र. १३७ - अशोक ऐवजी अमोघ
क्र. २१२ - विभा ऐवजी वीणा
क्र. २१३ - प्राजक्ताऐवजी प्रांजल
क्र. १९९ - गावाचे नांव भोपाळ
क्र. १९९ अ - नवीन नांव लिहावे
श्री. प्रसन्न जनार्दन - भोपाळ

४. **पृ. २१**
- पत्रलेखकाचे नांव प्रभाकर केशव ऐवजी परशुराम केशव

५. **कव्हर पृ.३**
'उपस्थित ज्येष्ठांचा सन्मान' याखालील पहिल्या दोन फोटोंखालील नावांची अदलाबदल झाली आहे. रुक्मिणी विष्णू ऐवजी भागीरथी रामचंद्र आणि भागीरथी रामचंद्र ऐवजी रुक्मिणी विष्णू असे वाचावे.

**खाणा-प्येणा सुव्यवस्थित त्सलां**

मे त्याहां आय्लेल्यावेळा तुम्ही दाख्खेय्ल्ले आदर, सन्मानाला माला भारी संतोसु झालोत्से। मराठे सम्मेलन अव्वल रीत्या झालात्से म्हणि म्हणोयेर। सम्मेलनावेळ खाणा-प्येणा वगैरे सुव्यवस्थित त्सलां। - **एम्. भालचंद्र डोंग्रे**, मैसूर

**तरुणांचा सहभाग स्पृहणीय**

२५वे मराठे परिवार संमेलन खूपच छान झाले. जवळजवळ २००-२२५ प्रतिनिधी आले. त्यांची उत्कृष्ट व्यवस्था ठेवली होती. **यात तरुणांचा सहभाग स्पृहणीय होता.** अजित व त्याचे कुटुंबीय ह्यांच्याकडील वास्तव्यात परकेपणा जाणवलाच नाही. सर्व गोवेकरांचे अभिनंदन. - **प्रमोद वृष्ण** (पृ.३७६), ठाणे

**पालखी - संग्राह्य अंक**

अधिवेशन काळात तुम्ही सर्वांनी किती कष्ट घेतले आहेत याची पदोपदी जाणीव होत होती. छोट्या खेड्यात संमेलन यशस्वीपणे पार पाडून दाखवणे सोपे नाही. पण गोव्याच्या सर्व टीमने ते यशस्वी करून दाखवले.

आम्ही ३०च्या रात्री डिचोलीला मुक्कामाला गेल्यामुळे इच्छा असूनही दशावतारी नाटक पूर्ण पाहू शकलो नाही. दुसऱ्या दिवशी सकाळचे चांगले व्याख्यान ऐकू शकलो नाही व रात्रीचा गोंधळाचा कार्यक्रमही पाहू शकलो नाही याबद्दल वाईट वाटले.

सांस्कृतिक कार्यक्रमात गोव्यातील बायकांचा फुगडी हा कार्यक्रम खूपच आवडला. त्यांनी बसवलेले सर्वच करमणुकीचे कार्यक्रम छान होते.

'पालखी' अंकाची रचना, छपाई, अंतर्गत मजकूर सर्व गोष्टी खूपच चांगल्या साधल्या आहेत. अंक संग्राह्य आहे. - **सौ नीलांबरी रमेश** (पृ.२८०), पुणे

**संमेलन - एक सुखद अनुभव**

गोवेकर मराठे परिवार संघाने हे संमेलन गोव्यात भरवून विशेषत: बिंबलसारख्या खेडेगावात कोणत्याही तऱ्हेची उणीव भासू न देता आम्हा सर्वच मराठे परिवारास एक सुखद असा अनुभव दिला.

विशेषत: आपण **आमची घराघरातून केलेली व्यवस्था व त्या सर्वांनी दाखविलेली आपुलकी खरोखरच उल्लेखनीय** आहे. हे सर्व आठवून आम्हांस पुनर्अनुभवाचा आनंद लुटता येतो. - **दिनकर रामचंद्र** (पृ.१६९), मुंबई

***

**हितगुज वर्गणीदारांचे पत्ते** (आपापल्या गावातील हितगुज वर्गणीदारांशी संपर्क साधता यावा यासाठी डिसेंबर २००४ पासून क्रमाक्रमाने हितगुज वर्गणीदारांचे पत्ते देण्यात येतात. पश्चिम महाराष्ट्रातील उर्वरित जिल्हे आणि विदर्भ मराठवाड्यातील हितगुज वर्गणीदारांचे पत्ते या अंकात दिले आहेत.)

## नाशिक, धुळे व जळगांव जिल्हे

३०१३/७१०/३८६के/के-०४७
सुरेश भास्कर मराठे
१८, श्रीनिवास अपार्टमेंट, पंचवटी कारंजासमोर,
कारंजा, पंचवटी, **नाशिक** ४२२ ००३.

२८८७/७१८/३८६जी/के-०४७
संदीप वसंत मराठे
पाटील कॉलनी लेन नं. ३, कॉलेज रोड,
**नाशिक** ४२२ ००१.

२४२१/४५/३६३४/के-०४६
श्री. अनंत दत्तात्रय मराठे, द्वारा सं. अ. मराठे,
फ्लॅट ८, रिजंसी टॉवर्स, सावरकर नगर जवळ,
शंकर नगर, गंगापूर रोड, **नाशिक** ४२२ ०१३.

२६५२/२१३/३९७जी/के-०४८
नितिन शंकर मराठे
ओंकार, प्रशांतनगर जवळ, पाथार्डी,
**नाशिक** ४२२ ०१०.

६३८/३५९एएस/के-०४६
सौ. कुसुम त्र्यंबक टिळक
भाग्योदय बंगला, दत्तमंदिर जवळ,
जमनागिरी रोड, **धुळे** ४२४ ००१.

२५५५/३८/१५३डी/के-०२३
विद्याधर विनायक मराठे
श्री अवधूत मुद्रणालय, गणेश पेठ, गणपती मंदिराजवळ,
**नंदुरबार**, जि. **धुळे** ४२५ ४१२

३०१४/७१७/३५९टी१/के-०४६
श्रीकृष्ण (किशोर) भास्कर मराठे
२००, विश्रामबाग,
**नाशिक** ४२२ ००१.

३०१२/७१५/७३७एन/के-१०९
आनंद अरविंद चक्रदेव
२, भानुप्रसाद अपार्टमेंट, कॅनडा कॉर्नर,
**नाशिक** ४२२ ००५.

२४३३/२११/३६३एफ/के-०४६
दिगंबर दत्तात्रय मराठे
द्वारा जयंतराव दामले, मंगल नगर, संचित बंगला,
गांगापूर रोड, **नाशिक** - ४२२ ००५.

१२१६/७४९/३९९ई/के-०४८
वसंत सुरेश मराठे
१, कमला विहार अपार्टमेंट, एच.डी.एफ.सी. मागे,
शरणपूर त्र्यंबक लिंक रोड, **नाशिक** ४२२ ००५.

२४५१/२६४/२९७डी/के-०३६
किरण सीताराम मराठे, पारिजातक, प्लॉट नं ५०,
सैनिक को. ऑप. हौ. सोसा., दारणा कॅम्प, देवळाली,
जि. **नाशिक** ४२२ ४०१.

२९४८/९९११/६९७सी/के-१०४
प्रकाश अच्युत खांबेटे
छायाप्रकाश, आर. आर. हायस्कूल जवळ,
जिल्हा पेठ, **जळगांव** ४२५ ००१.

२६४४/६३३/०३१बी/के-००१
श्रीपाद महादेव मराठे
द्वारा मनोहर शंकर नाईक
२ विष्णूनगर, गणेश कॉलनी, **जळगांव**.

## मराठवाडा व विदर्भ जिल्हे

१२०९/९९०६/२३८सी/के-०३२
विवेक श्रीकांत मराठे
कृष्णकुंज, २ सरस्वती कॉलनी,
औरंगपुरा (पू.), **औरंगाबाद** ४३१ ००१.

२७६५/२७६/६४६ई/के-०३२
सुधीर चिंतामण विद्वांस
समाधान, घर नं. १/५/७७, ब्राह्मण गल्ली,
बेगमपुरा, **औरंगाबाद** ४३१ ००४.

२१३९/२६५/२८०ई/के-०३५
प्रा. वसंत दत्तात्रय मराठे
डी/३, चेतना नगर, श्रेया नगर मागे,
**औरंगाबाद** ४३१ ००५.

२९५०/६३९/३७३बी/के-०४६
अरुण बाळकृष्ण मराठे
एडिटर, दैनिक हिंदुस्थान, बकुळ स्ट्रीट,
खापर्डे बगीचा, **अमरावती** ४४४ ६०१.

२६३४/१२८/१०१डी/के-०११
अशोक आनंद मराठे
'आनंद', प्लॉट नं. ६२, गजानन नगर,
हिंदुस्थान कॉलनी जवळ, **नागपूर** ४४० ०१५.

२६३५/१३०/२५६ए/के-०३४
पद्माकर नरहरी मराठे
ज्योती फ्लॅट्स, आर/३, लक्ष्मी नगर,
**नागपूर** ४४० ०२२.

२४८५/१३१/१९६ए/के-०२९
रामचंद्र श्रीपाद मराठे
३२/ए, दीप अपार्टमेंट, खामला, पांडे लेआऊट,
**नागपूर** ४४० ०२५.

४००२/१३४/२८३ए/के-०३५
माधव गोविंद मराठे
विकास बंगला, जुनी रामदास पेठ,
नागपूर टाईम्स प्रेसच्या मागे, **नागपूर** ४४० ०१०.

पीपीपीपी ७२३/४५८एम/के-०६१
दत्तात्रय (प्रभाकर) गोपाळ मराठे
२२४, पांडे बिल्डींग, गोकुळ पेठ,
सम्राट टाईपिंग इन्स्टिट्यूट समोर, **नागपूर** ४४० ०१०.

पीपीपीपी ७२२/२३६बी/के-०३२
श्रीराम रघुनाथ मराठे
प्लॉट नं. ४०, लेंद्र पार्क, श्रीराम भवन,
नवी रामदास पेठ, **नागपूर** ४४० ०१०.

### ऐसी अपनी वाईफ हो
**(सौजन्य इंटरनेट)**

५ फूट ५ इंच जिसकी Height हो
Jeans जिसकी Tight हो
चेहरा जिसका Bright हो
Weight में थोडी Light हो
उमरमें Difference Slight हो
थोडीसी वो Quite हो
ऐसी अपनी वाईफ हो
सडक पर सब कहे क्या Cute हो
भीडमे सब कहे Side हो Side हो
India की पैदाईश हो
सासकी सेव जिसकी ख्वाईश हो
ऐसी अपनी वाईफ हो
पडोस जब बात करे तो हातमे उसके Knief हो
Dinner candle light हो,
दोनो में ना कभी Fight हो
मिलन के बाद दिल Delight हो
हे प्रभू तेरी अर्चना उसकी Life हो
ऐसी अपनी वाईफ हो
काश ये 0.0001% भी Right हो
अगर ऐसी अपनी Wife हो
तो क्या हसीन Life हो,
हर किसीकी यही फर्माइश हो
कुदरत की भी आजमाईश हो,
हाय, काश कहीं तो एक ऐसी पैदाईश हो,
ऐसी अपनी वाईफ हो

**- प्रेषक: उदय दत्तात्रय**, पृ.३२४, मुलुंड

२८६२/५३२/३७२जे/के-०४६
प्रभाकर केशव मराठे
११०, शिवाजी नगर, धरमपेठ एक्स्टेंशन,
**नागपूर** ४४० ०१०.

२५५७/९२९/२३५/के-०३२
प्रभाकर महादेव मराठे
मु. मोरेवाडी, पो. चेनई,
ता. **आंबेजोगाइ**, जि. बीड.

२४८३/१६३/०२९एफ/के-००१
यशवंत दत्तात्रय मराठे, सागर पॅलेस, फ्लॅट नं. २,
सिडको, मासाहेब चौक, दीपसेवा डेकोरच्या वर,
**औरंगाबाद** ४३१ ००१.

४००४/२६६/१८७डी/के-०२७
दिगंबर गंगाधर मराठे
एम-३, चेतना नगर, श्रेया नगरच्या मागे,
औरंगाबाद ४३१ ००५.

२९३५/६१३/४६७जे/के-०६२
अरुण अच्युत मराठे
इंद्रायणी, ९१ जालना नगर, पैठण रोड,
औरंगाबाद ४३१ ००५.

२१४१/३५/४१३ए/के-०५२
वामन रामचंद्र मराठे, रामदरबार,
जुन्या दत्त मंदिर जवळ, गजानन मंदिर समोर,
कुंभार वाडा, **अमरावती** ४४४ ६०१.

डॉ. प्रमोद अरुण मराठे
३ पैनगंगा गंगा पार्क्स,
जयस्वाल लेआऊट, हॉटेल राधिकासमोर,
**बुलढाणा.**

२५८४/३६/३२४एफएस/के-०४१
अरविंद विश्वनाथ मराठे
९१/इ, नरकेसरी लेआऊट, वर्धा रोड, खामला,
महर्षी कर्वे नगर, **नागपूर** ४४० ०२५.

२६३६/१३२/२३६एच/के-०३२
सतीश भास्कर मराठे
प्लॉट नं. १८९, पुरुषोत्तम, खामला,
पांडे लेआऊट, **नागपूर** ४४० ०२५.

पीपीपीपी/७२४/७२७ए/के-१०९
शिरीष शांताराम चक्रदेव
श्रीचक्र, देवी अचिल्य मंदिर जवळ,
टिकेकर रोड, धंतोली, **नागपूर** ४४० ०१०.

२८६१/५३१/७३९जी/के-१०९
श्याम गणेश चक्रदेव
८२, माधव नगर,
**नागपूर** ४४० ०१०.

२०१७/५३३/७५१ए/के-११२
विष्णू विश्वनाथ जोशी
कुबेर अपार्टमेंट्स, ३रा मजला,
शंकर नगर, **नागपूर** ४४० ०१०.

२८९३/४८५/३३४सी/के-०४२
दत्तात्रय कृष्ण मराठे
३०३, द्वारका सहनिवास, प्लॉट १०४,
शिवाजी नगर, **नागपूर** ४४० ०१०.

हसरे हितगुज

**शेम टु यू**

बंगालीत श, ष, स ही तीन्ही व्यंजने आहेत, पण उच्चार मात्र 'श' हा एकच. पु. ल. देशपांड्यांनी 'वंगचित्रे' मध्ये बंगाली माणूस शुभेच्छांना उत्तर म्हणून शेम ट यू (सेम टु यू) म्हणतो त्याचा मजेशीर उल्लेख केला आहे. - **गजानन भास्कर** (पृ.४२७), घाटकोपर

# सुखाचा शोध

**- सौ. विद्या सुनील चक्रदेव** (पृ.७३३), **मुलुंड, मुंबई**

***चाकाशिवाय रथ चालत नाही, तारा नसतील तर वीणा वाजत नाही, शंभर मुलगे असले तरी पण जर एक पती नसेल तर स्त्री सुखी होत नाही. त्याप्रमाणे मनुष्य जीवनात परमेश्वर भक्तीचा समावेश नसेल तर जिणे व्यर्थ ठरते.***

मनुष्याच्या जन्ममृत्यूला वासना म्हणजेच सूक्ष्म मन कारण आहे. या वासनेच्या आधारेच मनुष्य चांगली-वाईट फळे भोगीत असतो. ती फळे भोगण्यासाठी कुठल्यातरी देहाचा आधार घ्यावा लागतो. म्हणूनच गीतेत भगवान श्रीकृष्णांनी म्हटले आहे - ''ईश्वरार्पण बुद्धीने कर्मे केली तरच जन्ममरणाचा फेरा चुकेल.'' परंतु सुमार मती असलेला मनुष्य सारासार विवेक करू शकत नाही. अशा मनुष्याने केवळ नामस्मरणाने ईश्वर प्रसन्न करून घ्यावा. परंतु पूर्वसुकृताची अनुकूलता ज्यांना असते त्यांनाच नामस्मरणाची गोडी लागते.

काल झालेले अजीर्ण आजच्या लंघनामुळे नाहीसे होते. त्याप्रमाणे पूर्वजन्मातील कर्मांचे दोष ह्या जन्मातील शुभकर्मांनी नाहीसे होतात. अनंत जन्मांची यातायात भोगून ईश्वराची भेट घडवून आणणारा हा नरदेह (वर्तमानजन्म) ज्यांनी सार्थकी लावला तोच मनुष्य प्रपंचरूपी भवसागर तरुन जाण्यास पात्र ठरला. श्रीसमर्थांचा उपदेश अंगिकारल्यास मानवी जीवनाचे अलौकिक ईप्सित साध्य होते.

मनुष्याला जी दु:खे भोगावी लागतात ती केवळ देहाची आसक्ति धरल्यामुळेच. चाकांचे आरे जसे एका मागोमाग फिरतात. त्याप्रमाणे दु:खामागून सुखे व सुखामागून दु:खे येतात. म्हणून त्या सुखात गुंतून राहू नये.

प्रत्येकाचा 'मी' त्याच्या सर्वात परिचयाचा आहे. जन्मभर त्याच्याबरोबर तो राहतो. पण त्या 'मी'चे स्वरूप कळत नाही हे पहिले आश्चर्य. प्रत्येक जण जीवनाचे सारे व्यवहार मनाच्या द्वारा करतो. सुख काय आणि दु:ख काय? माणूस ते मनाने भोगतो. असे असून ते मन कोणाच्या ताब्यात येत नाही हे दुसरे आश्चर्य आणि क्षणोक्षणी प्रपंचात सुख नाही, दु:खच आहे अशी तक्रार सर्वजण करतात. पण तो सोडायला कोणी तयार होत नाही, हे तिसरे आश्चर्य होय. थोडक्यात मनाची स्थिरता आणि चंचलता हीच सुखदु:खाचे कारण आहे.

सर्व प्रापंचिक कर्मे करत असतानादेखील आपले मन त्यापासून शक्य तितके अलिप्त ठेवण्याचा प्रयत्न केल्यास मानसिक व आत्मिक सुख मिळू शकेल. कमलपुष्प चिखलात उगवत असले तरीही त्यास मृत्तिकेचा लेप न लागता ते पाण्यावर तरंगत असते. त्याप्रमाणे आपण प्रपंचाच्या पाण्यावर तरंगण्याऐवजी प्रपंचाच्या तळाशी गेलेलो असतो आणि तेथे फसून बसतो. याकरिता 'मी मुक्त आत्मा आहे' हे आत्मचिंतन ज्याच्या अंतर्यामी (अंत:करणात) सदैव चालू असते तोच सुखी असतो.

सकाळ संध्याकाळ, दिवस रात्र, शिशिरवसंत एका मागोमाग येतात नि जातात. ही सर्व काळाची लीला आहे. ह्या कालचक्रात आपले आयुष्य कमी कमी होत असते. प्रत्येक क्षण आयुष्याची वजाबाकी करीत असतो. म्हणूनच मनुष्याने मुक्तीचे लक्ष साधण्यासाठी मनाने ईश्वराला अर्पण व्हावे. ईश्वराची जाणीव विसरल्यामुळे आपण प्रपंचात 'हे माझे, हे मी केले' अशी अभिमानाची भाषा करतो.

या जगात काळाची सत्ता ज्याच्यावर चालत नाही अशी एकच गोष्ट आहे ती म्हणजे मनुष्याच्या

हृदयातील 'आत्मा'. खऱ्या सुखाचा उगम चित्ताच्या शांतीत असतो. पापपुण्य मनाच्या वृत्तीवर अवलंबून आहे. ज्या रसात मिळवावे त्यात आपले मन मिसळून जाते. म्हणून मनाला सद्गुणाच्या किंवा नामस्मरणाच्या रसात मिळवणे हे मुख्य ध्येय असले पाहिजे. मनुष्याच्या ठायी एक समाधान असेल तर कुठल्याही बाह्य उपचाराची आवश्यकता वाटणार नाही.

सुखोपभोगाच्या पोटात दुःख भरलेले आहे. मनुष्याला उत्तम गती किंवा अधोगती प्राप्त करून देण्यात मनुष्याचे 'मनच' कारण आहे. मनाच्या उलट झाले की दुःख होते, मनाच्या सुलट झाले की सुख होते. संत सांगतात की मनाला वश करणारी ताकदही मनुष्याच्या अंतर्यामी आहे. देहाची नवद्वारे त्यागून जेव्हा तृतीयनेत्रस्थानी पोचाल व तेथे नामरूपी अमृताचे पान कराल तेव्हाच मन आपल्या स्वाधीन होईल. मनुष्याच्या जीवनातील सर्वोच्च आनंद केवळ नामस्मरण, ईशचिंतन, परोपकार, सेवा, सत्कर्मे, दानधर्म, त्यागक्षमावृत्ती, सत्संग व गुरूप्राप्ती करून घेणे यातच सामावलेला आहे.

व्यावहारिक गोष्टी जीवनाला आवश्यक असल्या तर अंतरीचे जीवित व्यापक आणि गहन असते. आत्मिक सुखाचा अनुभव घेण्याचा प्रयत्न करण्यात मनुष्य जीवनाचे सार्थक आहे.

* * *

हसरं हितगुज

**हातमोजे घालून प्रेम**

पंडित नेहरुंची एक आठवण.

इंदिरा गांधी सतरा-अठरा वर्षाच्या होत्या. त्या एक दिवस आंब्याची फोड चोखून न खाता, चमच्याने खात होत्या, ते नेहरुंनी पाहिले. ते म्हणाले, ''चमच्याने आंबा खाणे म्हणजे हातमोजे घालून प्रेम करण्यासारखे आहे.'' अशी रसिकता आगळीच.

**- गजानन भास्कर** (पृ.४२७), घाटकोपर

# आपण यांना ओळखता का?

खालील वर्गणीदारांचे अंक परत येत आहेत. यापैकी कोणाचा ठावठिकाणा वाचकांपैकी कोणाला कळल्यास कृपया **संपादक, हितगुज यांस कळवावे** (फोन २५६८०१०४ अथवा निवासाचा पत्ता : अ-२३ सुयोग सोसायटी, मुलुंड (पूर्व), मुंबई ४०००८१)

१. **उपेंद्र दत्तात्रय मराठे,** २६/१८२१, समाधान सोसायटी, अभ्युदय नगर, **काळाचौकी, मुंबई** ४०० ०३३. (हित. ७११)

२. **प्रभाकर जगन्नाथ विद्वांस,** ५/६२, पार्वती निवास, **माटुंगा (पूर्व), मुंबई** ४०० ०१९. (हित. ५९९)

३. **अभय यशवंत मराठे,** ११७/३८३९, नेहरू नगर, **कुर्ला (पूर्व), मुंबई** ४०००२४. (हित. ५२८)

४. **प्रभाकर दामोदर चक्रदेव,** सी-१, सुमन नगर, **चेंबूर, मुंबई** ४०० ०७१. (हित. २४९)

५. **संजय दिगंबर खांबेटे,** ७/३०१ MHP II, MHADA, न्यू लिंक रोड, ओशिवरा पोलिस स्टेशन समोर, **अंधेरी (प.), मुंबई** ४०००५३ (हित. २३२)

६. **विद्याधर अनंत खांबेटे,** ए-६०३, इंडियन ऑईल नगर, वर्सोवा रोड, जे. पी. रोड, **अंधेरी (प.), मुंबइ** ४०००५८. (हित. ६८२)

७. **मधुसूदन गोपाळ जोशी,** मेमिसिंग चाळ नं. २, रुम नं. ३, बांद्रेकरवाडी, **जोगेश्वरी (पूर्व), मुंबई** ४०००६०. (हित. ५१७)

८. **संजय भानुदास मराठे,** ई/१३, शीतल समीर, विकास नगर, डहाणूकर वाडी, **कांदिवली (प.), मुंबई** ४०००६७. (हित. ४०१)

९. **शीतल सुधीर मराठे,** ७१-डी/६, मंदार सोसायटी, गोराई, म्हाडा, **बोरिवली (प.), मुंबई** ४०००९१. (हित. ८६५)

१०. **रामकृष्ण गणेश मराठे,** बि. ए/६/१४, फ्लॅट नं. ४८, एलिजिबल सोसायटी, जीवन बीमा नगर, **बोरिवली (प.), मुंबई** ४००१०३. (हित. २५०)

११. **विनय भालचंद्र मराठे,** बी-७, नान्सी कॉम्प्लेक्स बिल्डींग, श्रीकृष्ण नगर, संत ज्ञानेश्वर रोड, **बोरिवली (पूर्व), मुंबई** ४०००६६. (हित. ८७३)

१२. **प्रशांत दिनकर मराठे,** २०२ बी, धीरज एन्क्लेव्ह, भोर इंडस्ट्रीज समोर, **बोरिवली (पूर्व), मुंबई** ४०००६६. (हित. ८६८)

१३. **किरण प्रभाकर मराठे,** सरस-२, हाऊसफिन, १ला मजला, सेक्टर ११, **कोपरखैरणे, नवी मुंबइ** ४००७०५ (हित. ७४०)

१४. **सत्यनारायण रामनाथ मराठे,** जे. एन. ३, बिल्डींग १७, फ्लॅट नं. १३, सेक्टर १०, **वाशी, नवी मुंबई** ४००७०३. (हित. ६८४)

१५. **जयवंत विनायक मराठे,** २१ सरस्वती निवास, तुळीज रोड, **नालासोपारा (पू.), जि. ठाणे** ४०१२०९. (हित. ८८५)

१६. **शैलेश श्रीनिवास मराठे,** पीएल ५/४१/१० सिडको कॉलनी, **न्यू पनवेल, जि. रायगड** ४१०२०७. (हित. ५४८)

१७. **वसंत भालचंद्र मराठे,** सी ६ बि. नं. २०, I/२, सेक्टर १८, सिडको कॉलनी, **न्यू पनवेल, जि. रायगड** ४१०२०६. (हित. २००)

१८. **डॉ. वासुदेव मोरेश्वर मराठे,** केदार छाया, सदर बझार, कृष्णराव देसाई कॉलनी, **सातारा** ४१५००२. (हित. ४५२)

१९. **दत्तात्रय गोपाळ मराठे,** २२४ पांडे बिल्डींग, सम्राट टायपिंग इन्स्टिट्यूट समोर, गोकुळ पेठ, **नागपूर** ४४००१०. (हित. ७२३)

२०. **विनोद कृष्ण मराठे,** डी १७० राजदीप सोसायटी, पोलोग्राऊंड समोर, **वडोदरा** ३९०००१. (हित. ९०९)

२१. **श्रीराम माधव जाईल,** २०५ टिळक पथ, आपटे यांचे घर, **इंदोर** ४५२००४. (हित. ८२१)

२२. **सुधीर नारायण चक्रदेव,** बी-१६, बँक ऑफ इंडिया ऑफिसर्स कॉलनी, गौतम नगर, **भोपाळ** ४६२०२३. (हित. ८९९)

२३. **अरुण वसंत मराठे,** २७/५, वेदनगर, नानाखेरा, सावेर रोड, **उज्जैन** ४५६०१०. (हित. ५९४)

२४. **राजीव वामनराव मराठे,** ए १५, रक्षापुरम, लाडपूर, **डेहराडून** २४८००८ (हित. ८६६)

* * *

## *बडोद्यात वर्धापनदिनी सभा ?*

दरवर्षी वर्धापनदिन पुण्यात साजरा होतो. परंतु काही कारणामुळे उपस्थित राहता येत नाही. नेहमी असे वाटते की आपल्या गावी सर्व मराठे परिवार एकत्र येऊन काहीतरी कार्यक्रम व्हावा. परंतु मांजराच्या गळ्यात घंटा बांधणार कोण? - **नरेंद्र भास्कर**, सी-२९, समृद्धि टेनामेंट, दरबार चोकडी, मांजलपूर, बडोदे ३९० ००१.

*(आपली कल्पना खरंच छान आहे. पुढाकार स्थानिक लोकांनीच नको का घ्यायला? आपण बडोद्यातील ४/५ जणांशी संपर्क साधून सर्वांनी मिळून पुढाकार घ्यायची तयारी दाखवा. आम्ही जरूर सर्व ती मदत करू. बडोद्यातील १२ व अहमदाबादमधील १२ हितगुज वर्गणीदारांचे पत्ते डिसेंबर २००४ मध्ये छापले आहेत.* ***त्यांनीहि नरेंद्र भास्कर यांच्याशी आपण होऊन संपर्क साधावा ही विनंती*** *- संपादक)*

## *या अंकात*


१. **होय, मला लग्न करायचंय-**............. पृ.१
वामन गणेश, जोगेश्वरी, मुंबई

२. **मराठे कुलवृत्तांत उपलब्ध** पृ.२

३. **रद्दी विक्री निधी** पृ.३

४. **AN EARNEST APPEAL TO MARATHE PARIVAR** पृ.५
आनंद मराठे, कार्याध्यक्ष

५. **'वानप्रस्थाश्रम' संस्थेत नि:स्वार्थ कार्य करणाऱ्या कै. सौ. मंदाकिनी दामोदर** पृ.१५
**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर**, वडाळा, मुंबई

६. **अनोखी रोजगार संधी** पृ.१५
चिंतामणि त्र्यंबक, कळवा, जि. ठाणे

७. **गोवा संमेलन - उपस्थित कुलबांधवांच्या आणखी काही प्रतिक्रिया** पृ.१६

८. **ऐसी अपनी वाईफ हो**....................... पृ.१७
उदय दत्तात्रय, मुलुंड, मुंबई

९. **सुखाचा शोध**........................... पृ.१८
सौ. विद्या सुनील चक्रदेव, मुलुंड, मुंबई

१०. **आपण यांना ओळखता का ?**................... पृ.१९

याशिवाय **प्रतिष्ठान वृत्त** (पृ.२ ते ३), **सभासद वृत्त** (पृ.३ ते ५), **खुषीपत्रे** (पृ.४), हसरे हितगुज (पृ.१८,१९) **ही नेहमीची सदरे.**


बुक पोस्ट

प्रति


**मराठे प्रतिष्ठान**
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.
(दू. नं. ४३०२४५३)